रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १७ ◆ अंक ४७
www.ramprahar.com
रामप्रहर
सोमवार, २ सप्टेंबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

अंतरंग

महाविकास आघाडीविरोधात रोह्यात भाजपचे आंदोलन/२
वरसोली समुद्रकिनाऱ्यावर व्हेल मासा मृतावस्थेत/५
बोरघाटात दोन वाहनांच्या धडकेत एक जण ठार/७

काँग्रेसमध्ये कास्टिंग काऊच; महिला नेत्याचा आरोप

तिरूवनंतपूरम : मल्याळम चित्रपटसृष्टीत लैंगिक छळाचे आरोप होत असताना राजकारणातील कास्टिंग काऊचनेही डोके वर काढले आहे. काँग्रेसच्या महिला नेत्याने याबाबत गंभीर आरोप केले आहेत. राजकारणात पक्ष नेतृत्वाच्या जवळ असलेल्यांनाच संधी मिळत असल्याचा आरोप या महिला नेत्याने केला आहे. केरळ काँग्रेसमधील नेत्या सिमी रोझबेल जॉन यांनी केलेल्या या आरोपानंतर काँग्रेसमध्ये खळबळ उडाली आहे. एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी थेट विरोधी पक्षनेते व्ही. डी. सतिशन यांच्यावर निशाणा साधला आहे. मी त्यांच्या गुड बुकमध्ये जाऊ शकले नाही, कारण मी त्यांना खूश करू शकले नाही. नकारात्मक अनुभव आलेल्या अनेकांनी मला ते अनुभव सांगितले आहेत. त्याचे पुरावेही माझ्याकडून असून योग्यवेळी जगजाहीर करेन, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

रायगड जिल्हा उद्योगाचे मॅग्नेट

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन | उरण पालिकेच्या विकासकामांचे लोकार्पण आणि भूमिपूजन

उरण : प्रतिनिधी, बातमीदार, वार्ताहर

मी गेली दहा वर्षे सातत्याने सांगतोय की, मुंबईने गेली ५० वर्षे महाराष्ट्राला देशाच्या आर्थिक इंजिनच्या रूपाने काम केले. पुढील ५० वर्षे देशाचे आर्थिक इंजिन रायगड जिल्हा असणार आहे. ज्या प्रकारे अटल सेतूमुळे मुंबईची कनेक्टिव्हीटी रायगड जिल्ह्यात झाली, त्यामुळे इथला समुद्रकिनारा, इंडस्ट्रियल इको सिस्टिम या सगळ्याचा एकत्रित विचार केला तर सगळ्यात वेगाने विकसित होणारा जिल्हा रायगड असून उद्योगाचे खरे मॅग्नेट हा जिल्हा होणार आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी (दि. १) येथे केले.

(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

आमदार महेश बालदी यांच्या विशेष प्रयत्नाने उरण नगर परिषदेमार्फत पूर्ण झालेल्या विकासकामांचे लोकार्पण आणि नवीन विकासकामांचे भूमिपूजन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. हा सोहळा उरण येथील महाराष्ट्रभूषण तीर्थरूप डॉ. नारायण (नानासाहेब) विष्णू धर्माधिकारी नगर परिषद मराठी शाळा, पेन्शनर्स पार्क या ठिकाणी झाला. त्या वेळी ते बोलत होते.

या सोहळ्यास प्रमुख अतिथी म्हणून राज्याचे उद्योग व रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत, विशेष अतिथी खासदार श्रीरंग बारणे, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, तर प्रमुख उपस्थिती आमदार प्रशांत ठाकूर, आमदार रविशेठ पाटील, आमदार महेश बालदी यांची होती तसेच भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, उरण तालुकाध्यक्ष रविशेठ भोईर, शहराध्यक्ष कौशिक शाह, माजी नगराध्यक्ष सायली म्हात्रे, माजी उपनगराध्यक्ष जयविन कोळी, **(पान २ वर..)**

आमदार महेश बालदी यांच्या कार्याचे कौतुक

आपल्या भाषणात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमदार महेश बालदी यांच्या कार्याचे कौतुक केले. ते म्हणाले, महेशजींकडे अशी जादू आहे ते कोणाकडेही गेले तर काम करून घेऊ शकतात आणि कुठल्याही फाईलवर सही घेऊ शकतात. मागच्या वेळी मी मुख्यमंत्री असताना घारापुरी बेटावर वीज पोहचवण्याचे काम त्यांनी केले, ज्याची दखल देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी घेतली. पंतप्रधानांनी 'मन की बात'मध्ये याचा उल्लेख केला. लोकप्रतिनिधी म्हणून हीच क्वालिटी महत्त्वाची आहे.

आगरी समाजाच्या उन्नतीसाठी एकजुटीने पुढे जाण्याचा निर्धार

मेळावा उत्साहात; खासदार बाळ्यामामा म्हात्रे, संजय पाटील यांचा सत्कार

(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

उरण : रामप्रहर वृत्त

आगरी समाजाच्या सध्याच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय परिस्थितीचा विचार करून सामूहिक संघटनेच्या बळावर काही ठोस कार्यवाही करण्याच्या दृष्टीने निर्णय घेण्यासाठी अखिल आगरी समाज परिषदेतर्फे आगरी समाज काल आज आणि उद्या या शीर्षकाखाली समाजातील लोकप्रतिनिधी, विविध संस्थांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, हितचिंतक आणि समाज बांधव, भगिनींचा भव्य मेळावा रविवारी (दि. १) जासई येथील लोकनेते दि. बा. पाटील सभागृहात आयोजित करण्यात आला होता. या वेळी मान्यवरांनी आपली मते व्यक्त करून समाजाच्या उन्नतीसाठी एकजुटीने पुढे जाण्याचा निर्धार व्यक्त केला.

या मेळाव्यास आगरी समाज परिषदेचे अध्यक्ष दशरथ पाटील, सल्लागार माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, माजी मंत्री व ज्येष्ठ नेते जगन्नाथ पाटील, खासदार सुरेश उर्फ बाळ्यामामा म्हात्रे, खासदार संजय पाटील, आमदार गणेश नाईक, आमदार प्रशांत ठाकूर, माजी आमदार मनोहर भोईर, कामगार नेते महेंद्र घरत, उद्योगपती जे.एम. म्हात्रे, भाजप पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, कार्याध्यक्ष जे.डी.तांडेल, सरचिटणीस दिपक म्हात्रे, शिवसेना जिल्हाप्रमुख अतुल भगत, लोकनेते दिवंगत दि.बा. पाटील यांचे पुत्र अतुल पाटील, कामगार नेते भूषण पाटील, राजेश गायकर, संतोष केणे, दशरथ म्हात्रे, माजी नगरसेवक विकास घरत, विजय चिपळेकर, प्रीतम म्हात्रे, माजी नगरसेविका दर्शना भोईर, सुरेश ठाकूर, सोन्या पाटील, संतोष घरत, दीपक पाटील, भावना घाणेकर, वंदना घरत यांच्यासह आगरी समाजाचे बांधव आणि भगिनी उपस्थित होत्या.

या वेळी आगरी समाजातील नवनिर्वाचित खासदार सुरेश उर्फ बाळ्यामामा म्हात्रे व खासदार संजय पाटील यांचा सत्कार करण्यात आला. **(पान २ वर..)**

सामाजिक कार्यकर्ते रूपेश धुमाळ समर्थकांसह भाजपमध्ये

उरण : पनवेल तालुक्यातील कोल्ही कोपर येथील सामाजिक कार्यकर्ते रूपेश धुमाळ यांनी समर्थकांसह रविवारी (दि. १) उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला.

उरण भाजपच्या कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमास माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजप पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, उरण तालुकाध्यक्ष रविशेठ भोईर, राकेश गायकवाड, लोकनेते दिवंगत दि.बा. पाटील यांचे पुत्र अतुल पाटील, एस.के. नाईक, चंद्रकांत घरत आदी उपस्थित होते.

या वेळी रूपेश धुमाळ, जितेंद्र पाटील, शैलेश पाटील, प्रकाश घरत, विक्रम पवार, जितेंद्र पाटील, रूपेश पाटील, कुणाल नाईक, रोहित कोळी यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. या सर्वांचे स्वागत करण्यात आले.

निवडक

काँग्रेसच्या नेत्याची कुटुंबासह विष प्राशन करून आत्महत्या

रायपूर : छत्तीसगडमधील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पंचराम यादव (वय ६५) यांनी पत्नी व दोन मुलांसह विष पिऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. या चौघांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, मात्र त्यांची प्राणज्योत मालवली. समोर आलेल्या माहितीनुसार कंत्राटदार असलेल्या यादव यांनी दोन बँकांकडून ४० लाखांचे लोन घेतले होते. शिवाय त्यांना हृदयाशी निगडीत आजार होता तसेच त्यांची पत्नी कर्करोगाशी झुंज देत होती.

हावडा येथील रुग्णालयात अल्पवयीन मुलीचा विनयभंग

कोलकाता : पश्चिम बंगालमधील कोलकाता येथील महिला प्रशिक्षणार्थी डॉक्टरवरील बलात्कार व हत्येप्रकरणी वातावरण शांत झालेले नसताना हावडा येथील एका रुग्णालयातील कर्मचाऱ्याने दाखल असलेल्या अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याची घटना घडली आहे. सीटीस्कॅन केंद्रात त्याने तिच्यावर अत्याचार करण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

मराठवाड्यात पावसाचा धुमाकूळ; विदर्भालाही जोरदार तडाखा

हिंगोली, यवतमाळ : प्रतिनिधी

महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये सध्या मुसळधार पाऊस पडत आहे. विशेषत: मराठवाड्यात प्रचंड पाऊस पडत असून हिंगोलीसह अनेक जिल्ह्यांमध्ये जनजीवन विस्कळीत झाले आहे. दुसरीकडे विदर्भातही पावसाने दाणादाण उडवल्याचे चित्र आहे.

हिंगोली जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे नदी, नाल्यांना पूर आला असून बहुतांश भागात पिके पाण्याखाली गेली आहेत, तर शहरात शेकडो घरांसह दुकानांमध्ये पाणी घुसल्याने प्रचंड नुकसान झाले आहे. जवळपास दोनशेहून अधिक नागरिकांना प्रशासनाने सुरक्षितस्थळी हलविले आहे. नांदेडच्या अनेक भागात पूरपरिस्थिती निर्माण झाली आहे. जोरदार पावसामुळे छोटे-मोठे ओढे, नद्यांना पूर आला आहे. अनेक भागात मूग, सोयाबीनसह इतर पिके पाण्याखाली गेली आहेत. बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यात पावसाची संततधार सुरू असल्याने नागापूर धरण ओव्हरफ्लो झाले आहे. त्यामुळे नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आलाय.

यवतमाळ जिल्ह्यातील पुसद या ठिकाणी ढगफुटीसदृश्य झालेल्या पावसाने नाल्याला पूर आला. पुरामुळे नाल्याने रौद्र रूप धारण केले होते. या पुरात या भागातील शेतीपिकाचे मोठे नुकसान झाले आहे. काही घरात पुराचे पाणीसुद्धा शिरले होते. या वेळी घरात अडकलेल्या तीन जणांना रेस्क्यू करून वाचवण्यात आले. वाशिममध्येही नदी-नाल्यांना पूर आला आहे. वर्ध्यातही पावसाने जनजीवन विस्कळीत केले आहे.

पेणमध्ये आज मंत्री रवींद्र चव्हाण यांचा सत्कार सोहळा

पेण : प्रतिनिधी

पेणमध्ये सोमवारी (दि. २) राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांचा भव्य सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे. भाजपचे दक्षिण रायगड जिल्हा अध्यक्ष धैर्यशील पाटील यांना खासदार बनवण्यासाठी मंत्री चव्हाण यांनी महत्त्वाची भूमिका बजावल्याने पेण विधानसभा मतदारसंघातील कार्यकर्त्यांनी त्यांचा सत्कार आयोजिला आहे. हा सोहळा सकाळी ११ वाजता पेण येथील मुंबई-गोवा महामार्ग, गिरोबा हॉटेलजवळ होणार आहे.

या सोहळ्यास आमदार रविशेठ पाटील, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, माजी आमदार सुरेश लाड, भाजपचे रायगड लोकसभा निवडणूक प्रमुख सतीश धारप आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

ठाकरे गटाचे नेते चंद्रकांत खैरे यांचे वादग्रस्त वक्तव्य

छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी

मालवण येथील राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा पडल्याने महाविकास आघाडीने रविवारी (दि. १) राज्यभर आंदोलन केले. छत्रपती संभाजीनगरमध्ये या आंदोलनात सहभागी झालेले ठाकरे गटाचे नेते, माजी खासदार चंद्रकांत खैरे यांनी पत्रकारांशी बोलताना राज्यात दंगली झाल्या पाहिजेत, असे वादग्रस्त वक्तव्य केल्याने खळबळ उडाली आहे.

कुठल्याही गावात एखाद्या महापुरुषाचा पुतळा असेल आणि त्या पुतळ्याला कोणी धक्का लावला तर तिथे मोठ्या दंगली होतात. आज इतका मोठा प्रकार घडला आहे आणि मला एक कळत नाही की या घटनेनंतर महायुती सरकारच्याविरोधात दंगली का होत नाहीत? त्या झाल्या पाहिजेत, अशी मुक्ताफळे ठाकरे गटाचे नेते चंद्रकांत खैरे यांनी उधळली.

दरम्यान, चंद्रकांत खैरे यांच्या या विधानानंतर ठाकरे गटासह महाविकास आघाडीला हेच अपेक्षित आहे का, असा सवाल यानिमित्ताने उपस्थित झाला आहे. वास्तविक, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांसह देशाच्या पंतप्रधानांनी शिवरायांचा पुतळा पडण्याच्या घटनेवर माफी मागितली असून दोषींना कडक शासन करणार असल्याचे म्हटले आहे. तरीही हा विषय चिघळत ठेवून महाविकास आघाडीकडून हीन राजकारण सुरू असल्याची चर्चा आहे.

गणेशोत्सवासाठी बाजारपेठा सजल्या

शोभिवंत वस्तूंनी दुकाने गजबजली

पाली : प्रतिनिधी

कोकणातील सर्वात मोठा आणि लोकप्रिय उत्सव असलेला गणेशोत्सव अवघ्या सहा दिवसांवर आल्याने विविध प्रकारच्या साहित्याने रायगडच्या बाजारपेठा गजबजल्या आहेत. मुंबई, ठाण्यासह अन्य शहरातील कोकणवासी हमखास गणेशोत्सवात कोकणात आपल्या मूळ गावी येतात. या पार्श्वभूमीवर आगळावेगळा उत्साह पहायला मिळत आहे.

गणेशोत्सवासाठी लागणारे सर्व प्रकारचे पूजेचे साहित्य, आरास व सजावटीची साधनसामग्री, विजेची उपकरणे, बाजारात उपलब्ध झाली आहेत. भक्तगण बाप्पाच्या स्वागतासाठी विविध प्रकारची खरेदी करताना दिसत आहेत.

मखर, तोरणे, कंठी, कागदी व प्लास्टिकची शोभिवंत फुले आदी साहित्याने दुकाने सजली आहेत तसेच फळे, फुले, मोदक, मिठाई, प्रसादासाठी लागणाऱ्या पदार्थांची मोठ्या प्रमाणात आवक होऊ लागली आहे. विविध प्रकारची विद्युत तोरणे, चक्र आदी साहित्य इलेक्ट्रिक दुकानात लक्ष वेधत आहेत, तर बाप्पासाठी नाना आभूषणे, अलंकारांनी इमिटेशन ज्वेलरीची दुकाने सुशोभीत झाली आहेत.

गणेशोत्सव जिल्ह्यात जल्लोषात साजरा करण्याची परंपरा आहे. घरगुती आणि सार्वजनिक मंडळे हा सण मोठ्या प्रमाणात साजरा करतात. बाप्पाच्या आगमनाला काहीच दिवस शिल्लक असल्याने सर्वत्र लगबग दिसून येत आहे.

'तो' भाजपचा पदाधिकारी नाही!

पनवेल : रामप्रहर वृत्त

दै. पुढारीमध्ये दिनांक २९ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध झालेल्या बातमीच्या अनुषंगाने त्यातील उल्लेख झालेला व्यक्ती भाजपचा पदाधिकारी नाही. लोकांची आर्थिक फसवणूक केल्यामुळे त्या व्यक्तीचे १ नोव्हेंबर २०२३ रोजीच पक्षातून निलंबन करण्यात आले आहे. त्यामुळे त्याचा पक्षाशी कोणताही संबंध नाही, असे भाजपचे पनवेल शहर मंडल अध्यक्ष अनिल भगत यांनी स्पष्ट केले आहे.

पुढारी वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या बातमीसंदर्भात शहर अध्यक्ष अनिल भगत यांनी सांगितले की, या व्यक्तीने अनेक व्यक्तींबरोबर आर्थिक व्यवहार करून त्यांची आर्थिक फसवणूक केल्याची तक्रार प्राप्त झाल्याने याची गंभीर दखल घेत नोव्हेंबर २०२३मध्ये म्हणजेच नऊ महिन्यांपूर्वीच पक्षातून हकालपट्टी करण्यात आली आहे. त्यामुळे त्या व्यक्तीचा आणि पक्षाचा संदर्भ जोडणे योग्य नसून अशा प्रकारचा व्यक्ती पक्षात नसल्याचे आपल्याला समाधान आहे, असेही भगत यांनी म्हटले आहे.

महाडच्या रोशनी पारधीची रायगड क्रिकेट कर्णधारपदी निवड

अलिबाग : महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन (एमसीए) आयोजित १५ वर्षाखालील मुलींच्या आंतरजिल्हा आमंत्रित एकदिवसीय निवडचाचणी क्रिकेट स्पर्धेसाठी रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन (आरडीसीए)च्या मुलींचा संघ जाहीर करण्यात आला आहे. महाडच्या रोशनी पारधी हिच्याकडे रायगडच्या संघाचे नेतृत्व देण्यात आले आहे. येत्या सप्टेंबर महिन्यात ही स्पर्धा होणार असून स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या मुलींची निवड महाराष्ट्राच्या संघात होणार आहे. **(सविस्तर वृत्त पान २ वर..)**

पनवेल : सातारा येथील रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी यांनी 'रयत'चे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची त्यांच्या निवासस्थानी रविवारी सदिच्छा भेट घेतली. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, 'रयत'चे रायगड विभागीय पीआरओ बाळासाहेब कारंडे, टीआयपीएलचे संचालक अमोघ ठाकूर उपस्थित होते. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी चेअरमन चंद्रकांत दळवी यांचे स्वागत केले.

'मविआ'चे आंदोलन केवळ देखावा

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची टीका

मुंबई : प्रतिनिधी

सिंधुदुर्ग येथील राजकोट किल्ल्यावर बसवण्यात आलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळला. या घटनेनंतर महाराष्ट्र सरकारवर टीका केली जाते आहे. महाराष्ट्र सरकारला शिवद्रोही असे संबोधत आणि या घटनेचा निषेध करीत महाविकास आघाडीने मुंबईत निषेध मोर्चा आणि जोडे मारो आंदोलन केले. या आंदोलनाबाबत आता उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रतिक्रिया समोर आली आहे. हे सगळं आंदोलन म्हणजे देखावा आहे. भूतकाळातील घटनांबाबत काँग्रेस माफी

मागणार का? असा सवाल उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे.

छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचा स्वाभिमान आहेत. त्यांचा अवमान आम्ही खपवून घेणार नाही, असे म्हणत महाविकास आघाडीचे शेकडो कार्यकर्ते रस्त्यावर उतरले, मात्र उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हे आंदोलन राजकीय हेतूने प्रेरित असल्याची टीका केली आहे.

आज महाविकास आघाडीचे जे आंदोलन होत आहे ते पूर्णपणे राजकीय आंदोलन आहे. महाविकास आघाडी असो किंवा काँग्रेस कुणीही छत्रपती शिवरायांचा सन्मान केला नाही. पंडीत नेहरु, इंदिरा गांधी यांनी लाल किल्ल्यावरून केलेली भाषणं आठवा. एकाही भाषणात छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाचा उल्लेखही नव्हता. पंडीत नेहरुंनी डिस्कव्हरी ऑफ इंडिया या पुस्तकात छत्रपती शिवरायांचा अपमान केला. याबद्दल महाविकास आघाडी आणि काँग्रेस पक्ष माफी मागणार का? असा सवाल उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला.

ते पुढे म्हणाले, मध्य प्रदेशात कमलनाथ मुख्यमंत्री असताना छत्रपती शिवरायांचा पुतळा बुलडोझरने हटवला. याची माफी काँग्रेस मागणार का? कर्नाटकात छत्रपती शिवरायांचा पुतळा तोडण्यात आला. त्याबद्दल काँग्रेस माफी मागणार का? काँग्रेसने सातत्याने शिवरायांचा अपमान केला. आधी त्यांनी देशाची आणि जगभरात जे शिवप्रेमी आहेत त्यांची माफी मागितली पाहिजे, असेही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

रोह्यात महाविकास आघाडीविरोधात भाजपचे आंदोलन

धाटाव : प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल बेगडी प्रेम दाखवणाऱ्या महाविकास आघाडीच्या दुटप्पीपणाबद्दल भारतीय जनता युवा मोर्चाकडून रोहातील सागर डेअरी चौक येथे रविवारी (दि.१) आंदोलन करण्यात आले.त्यानंतर दमखाडी येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारमास पुष्पहार घालण्यात आला. मालवणमधील राजकोट येथील शिवरायांच्या स्मारकाबाबत झालेल्या दुर्घटनेबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शिवभक्तांची दिलगिरी व्यक्त केली, मात्र महाविकास आघाडीकडून घटनेचे राजकारण करण्यात येत असल्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रमध्ये भारतीय जनता युवा मोर्चा आंदोलन या राजकारणाचा निषेध करीत आहे.

राजकारण करायला भरपूर विषय आहेत, मात्र शिवरायांच्या विषयांवर राजकारण करण्याचे पाप महाविकास आघाडी करीत आहे. हे आम्ही खपवून घेणार नाही, असे रोहा तालुकाध्यक्ष अमित घाग यांनी सांगितले.

दक्षिण रायगड जिल्हा सरचिटणीस रोशन चाफेकर यांनी, महाविकास आघाडी

आगामी विधानसभा डोळ्यासमोर ठेवून महाराष्ट्रमध्ये भ्रमनिरास करते. शिवाजी महाराज हे जाणता राजा नाहीत असे वक्तव्य करणारे, शिवरायांबाबत आक्षेपार्ह शब्द वापरणारे, तसेच कर्नाटकमध्ये शिवरायांचा पुतळा रात्री हटवणारे काँग्रेसी हे सगळे शिवरायांबद्दल बेगडी प्रेम दाखवतात, असे मत मांडले. ही घटना घडली ती दुर्दैवी आहे, मात्र याचे भांडवल विरोधकांनी न करता शिवरायांच्या विचारांवर काम करीत राहुया, अशी भावना रोहा शहराध्यक्ष यज्ञेश भांड यांनी मांडली.

या वेळी तालुका सरचिटणीस कृष्णा बामणे, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष महेश ठाकुर, युवा मोर्चा जिल्हा चिटणीस नरेश कोकरे, युवा मोर्चा तालुका सरचिटणीस निलेश धुमाळ, युवा शहराध्यक्ष अनिल घरजाळे, युवा वॉरिअर जिल्हाध्यक्ष वैभव कुळकर्णी, महिला मोर्चा जिल्हा सरचिटणीस जयश्री भांड, महिला तालुका सरचिटणीस रिया कासार, ज्योती सनलकुमार, आयटी तालुकाध्यक्ष निखिल बोरोले, तालुका चिटणीस शैलेश रावकर,सुमित रिसबुड, संकेत मोरे, प्रकाश साळुंखे, रघुनाथ कोस्तेकर,सचिन मोरे, ऋषिकेश किर्जत, संस्कृती ओक, सागर ओक, सुमित जंगम, अनिल खंडागळे, आदर्श गायकवाड,रितेश कीर्तने, भरत ठाकरे, करण सोनुने, राकेश गुंदेशा, सोशल मीडिया तालुकाध्यक्ष राकेश चाफेकर, कार्यकर्ते उपस्थित होते.

केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळांकडे विधानसभेसाठी मोठी जबाबदारी

पुणे : प्रतिनिधी

भाजपने आगामी विधानसभेसाठी गेल्या काही महिन्यांपासून रणनीती आखण्यास सुरुवात केली आहे. याचाच एक भाग म्हणून पुण्यातून लोकसभा लढलेल्या आणि पहिल्याच प्रयत्नात यशस्वी होऊन थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मंत्रिमंडळात राज्यमंत्रीपदी वर्णी लागलेल्या केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यावर पक्षाने मोठी जबाबदारी दिली आहे.

पुणे लोकसभा मतदारसंघातील तीन विधानसभा मतदारसंघांची जबाबदारी मोहोळ यांच्याकडे देण्यात आली असून यामध्ये कसबा, पर्वती आणि पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघांचा समावेश आहे.

विधानसभेमध्ये अधिकाधिक जागा महायुतीच्या माध्यमातून मिळविण्याचा संकल्प भाजपने सोडला आहे. यासाठी विविध स्तरावर प्रयत्न केले जात आहेत. राज्यातील प्रमुख नेत्यांना विधानसभा मतदारसंघ वाटून दिले जाणार असून तेथे प्रत्यक्ष जाऊन या नेत्यांना पाहणी करीत कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांशी संवाद साधावा लागणार आहे.

मतदारसंघात जाऊन मतदार नावनोंदणी मोहीम, बूथ रचना, शासकीय कार्यक्रमांचा आढावा, महिलांचे कार्यक्रम, योजनांचा लाभार्थ्यांना कसा फायदा होईल आणि निवडणुकीच्या दृष्टीने आवश्यक त्या सर्व कामांचा आढावा घेणे, ही जबाबदारी त्यांच्यावर असणार आहे.

वाहतूक पोलिसांची धडक कारवाई

अलिबाग : रामप्रहर वृत्त

रायगड जिल्ह्यात सध्या पावसाळी पर्यटन हंगाम सुरू आहे. त्यामुळे बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्यांची संख्याही वाढली आहे. जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शनिवारी (दि.३१) वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण १६७ चालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून एक लाख ८३ हजार ६०० रुपये इतका दंड आकारला आहे. पोलिसांच्या धडक कारवाईने चालकांचे धाबे दणाणले आहेत. ही कारवाई पुढेही अशीच सुरू राहणार असल्याचे वाहतूक पोलिसांकडून सांगण्यात आले आहे.

गणेशोत्सवात दणदणाट केल्यास डिजेवर कारवाई

पुणे : प्रतिनिधी

गणेशोत्सवात काळातील दणदणाट आरोग्याच्या दृष्टीने चिंतेचा विषय बनत आहे. डीजेचा आवाज आणि लेझर शो यामुळे यापूर्वी अनेकांना कर्ण आणि दृष्टी दोषास सामोरे जावे लागले आहे. काहींना हा आवाज सहन न झाल्याने जिवाला मुकावे लागल्याचेही निदर्शनास आले आहे. ही बाब विचारात घेऊन ध्वनी प्रदूषण रोखण्यासाठी राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने नवीन नियम घालून दिले आहेत.

गणेशोत्सवातील ध्वनी प्रदूषणाविषयी श्रवणतज्ज्ञ डॉ. कल्याणी मांडके यांनी केलेली याचिका निकाली काढताना एनजीटीने हे नियम घालून दिले असून, त्यांचे पालन करण्याची जबाबदारी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळ व पोलिसांवर सोपविली आहे.

एनजीटीचे न्यायिक सदस्य दिनेशकुमार सिंग आणि तज्ज्ञ सदस्य डॉ. विजय कुलकर्णी यांनी हा निकाल दिला आहे.

गणेश मंडळांच्या मांडवात व जवळच्या ठिकाणी आवाजाचे 'रिअल-टाइम' निरीक्षण करावे, मांडवात दोन ठिकाणी डिजिटल डिस्प्ले बोर्डांवर आवाजाची पातळी व मर्यादा नमूद असावी, त्यावर ध्वनिप्रदूषण आरोग्यासाठी हानिकारक असल्याचा वैधानिक इशारा असावा, विसर्जन मिरवणुकीत प्रमुख चौकांमध्ये आवाजाचे रिअल टाइम निरीक्षण करावे, या डिस्प्ले बोर्डांचा खर्च प्रदूषण नियंत्रण मंडळाने करावा, पोलिसांनी प्रदूषण नियंत्रण मंडळासह विचारविनिमय करून गणेश मंडळांना जास्तीत जास्त शंभर वॅट क्षमतेपर्यंत ध्वनी यंत्रणेला परवानगी देण्याचा विचार करावा, गणेश मंडळांनीही ध्वनियंत्रणेची परवानगी मागताना स्पीकर्सची संख्या व क्षमता नमूद करावी. मांडवाचे स्थान व आकारावर आवाजाच्या क्षमतेची मर्यादा शिथिल करण्याचा निर्णय घेण्याचा अधिकार 'एमसीबी'शी चर्चा केल्यावर पोलिसांना असेल.

विसर्जन मिरवणुकीत प्रत्येक मंडळातील ढोल-ताशा-झांज पथकातील सदस्यांची संख्या तीसपेक्षा अधिक नसल्याची खातरजमा पोलिसांनी करावी. विसर्जन मिरवणुकीत टोल व डीजे वाजविण्यास मनाई असल्याची सूचना पोलिस विभाग देईल, तसेच त्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर कायद्यानुसार कारवाई केली जाईल. ध्वनि प्रदूषण (नियंत्रण व नियमन) नियमावलीचे उल्लंघन झाल्यास पोलिस फौजदारी कायद्यानुसार कारवाई करतील. अनंत चतुर्दशीनंतर सात दिवसांच्या आत उत्सवात ध्वनिप्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांची नावे 'एमपीसीबी' दोन स्थानिक वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध करेल, तसेच अशा प्रकरणांचा तपशील संकेतस्थळावर प्रसिद्ध त्रकेला जाईल. गणेशोत्सवापूर्वी एमपीसीबीने या सूचना आणि ध्वनी प्रदूषणाच्या हानिकारक परिणामांबाबत व्यापक प्रसिद्धी करावी, अशा सूचनांचा त्यामध्ये समावेश आहे.

ठाकरे गटातील कार्यकर्ते शिवसेनेत

कर्जत : प्रतिनिधी

कशेळे येथील राष्ट्रवादी काँग्रेस व उद्धव ठाकरे गटातील कार्यकर्त्यांनी आमदार महेंद्र थोरवे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत जाहीर पक्षप्रवेश केला. त्यामुळे येणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने कर्जत तालुक्यातील कशेळे ग्रामपंचायतीमध्ये शिवसेनेची ताकद वाढत असल्याचे बोलले जात आहे.

कर्जतमधील बाळासाहेब भवन या शिवसेना जनसंपर्क कार्यालयात आमदार महेंद्र थोरवे यांच्या उपस्थितीत महेश मोहिते यांच्या नेतृत्वाखाली हा पक्षप्रवेश पार पडला. या वेळी जिल्हाप्रमुख

संतोष भोईर, खालापूर तालुकाप्रमुख संदेश पाटील, युवासेना विधानसभाप्रमुख प्रसाद थोरवे, अमोल देशमुख यांसह शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

या वेळी मनोज पवार, दिलीप पवार, विनोद पवार, दिलीप चव्हाण, विजय जाधव, अमर हंट्राडे, नितीन पवार, गणेश पवार, सागर मोहिते, करण पवार, सागर मोहिते, सनी जाधव, अर्जुन पवार, नंदा जाधव, प्रेम पवार, प्रशांत पवार, सुजल चव्हाण, अक्षय पवार, समीर खंडागळे, सिद्धार्थ जाधव, लिव्हो हंट्राडे, यांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला.

यज्ञेश उभारे याचे अपघाती निधन

माणगाव : पं. स.चे माजी सभापती प्रभाकर उभारे यांचा सुपुत्र यज्ञेश उभारे याचे अपघातात दुर्दैवी निधन झाले. हा अपघात शुक्रवारी (दि.३०) रात्री ११ वा.च्या सुमारास मुंबई-गोवा महामार्गावर नाणोरे गावाच्या हद्दीत

घडला. या अपघाताची फिर्याद अमेय प्रभाकर उभारे (वय-३७) रा. माणगाव यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली.

आरोपी आप्रोज रशीद मुजावर (वय २४, रा.दहिवली, कर्जत) याने अशोक लेलंड कंपनीची गाडी (एमएच ४६ बियु ५९१८) अतिवेगाने चालवून विरूद्ध दिशेला येऊन समोरून येणारी दुचाकी (एमएच. ०६ सीए ८६८७) ला धडक दिली. या अपघातामध्ये दुचाकीस्वार यज्ञेश प्रभाकर उभारे (वय २३) याला गंभीर दुखापती होऊन त्याचा मृत्यू झाला. माणगाव पोलीस ठाण्यात आरोपी आप्रोज मुजावरवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रायगडच्या १५ वर्षांखालील मुलींचा क्रिकेट संघ जाहीर; महाडची रोशनी पारधी कर्णधार

अलिबाग : प्रतिनिधी

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनतर्फे १५ वर्षांखालील मुलींच्या आंतरजिल्हा आमंत्रित एकदिवसीय निवड चाचणी क्रिकेट स्पर्धेसाठी रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या मुलींचा संघ जाहीर करण्यात आला आहे. या स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या मुलींची निवड महाराष्ट्राच्या संघात होणार आहे. महाडच्या रोशनी पारधी हिच्याकडे रायगडच्या संघाचे नेतृत्व देण्यात आले आहे. संघ व्यवस्थापक म्हणून प्रज्ञा सकपाळ यांची नेमणूक करण्यात आली आहे.

जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या

वतीने जिल्ह्यातील मुलींसाठी इनडोअर सराव शिबिराचे आयोजन रोशन क्रिकेट क्लब कामोठे येथे करण्यात आले होते. शिबिरासाठी प्रशिक्षक म्हणून नयन कट्टा, शंकर दळवी यांनी मुलींना मार्गदर्शन केले.

रायगड जिल्ह्याचा मुलींचा संघ

रोशनी पारधी कर्णधार, कनक यादव, नाझिया कॉन्ट्रॅक्टर, आर्या गडादे, वैभवी कुलकर्णी, अनिष्का वर्मा, स्वरा जगताप, स्तुती विठलानी, निशिता विठलानी, मधुरा बाबर, श्रेया पडळकर, ब्रताती राय, वैदवी वावेकर, ज्ञानेश्वरी येरूणकर. राखीव खेळाडू- स्नेहल पवार, प्रांजल घुळे, भूमी राणे, आर्या राजपूत, स्वरा भगत, प्रियांशी गायकवाड, श्रीजा वाघमोडे.

पान १ वरुन

रायगड जिल्हा उद्योगाचे मॅग्नेट

रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड, सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक गणेश देशमुख, उरण नगर परिषदेचे मुख्याधिकारी तथा प्रशासक समीर जाधव, सहपोलीस आयुक्त संजय ऐनपुरे यांच्यासह पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, रायगड जिल्ह्यातील करंजा येथे एक हजार मच्छीमार बोटी क्षमतेचे बंदर उभारणीच्या कामाला गती देण्यात येत असून त्यासाठी १५३ कोटींचा निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. करंजा मच्छीमार बंदरासाठी आमदार महेश बालदी यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे. त्यांना पूर्ण निधी उपलब्ध करून दिला जाईल. याशिवाय या ठिकाणी अत्याधुनिक अशी जेटी तयार करण्यात येणार असून हे बंदर देशातील सर्वात मोठे फिशिंग हार्बर म्हणून विकसित करण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे.

न्हावा-शिवडी अटल सेतूमुळे रायगड जिल्ह्याच्या विकासाला चालना मिळाली आहे. भविष्यात उद्योगाचे खरे मॅग्नेट रायगड जिल्हा होणार आहे. यामुळे जिल्ह्यात मोठ्या संधी निर्माण होणार आहेत. नवी मुंबई विमानतळामुळे जीडीपीमध्ये एक टक्के वाढ होणार आहे. डेटाचे हब म्हणून रायगड आणि नवी मुंबईची ओळख निर्माण झाली आहे. या दोन भागांमधून मोठ्या प्रमाणात डेटाची निर्मिती होत असून देशपातळीवर डेटा सेंटर्सची ६० टक्के क्षमता ही रायगड आणि नवी मुंबईत आहे. त्यामुळे या पुढील काळात महाराष्ट्राचे ग्रोथ इंजिन म्हणून रायगड जिल्हा होणार आहे.

मच्छीमारांचे हित जोपासत वाढवण बंदराची उभारणी करण्यात येत आहे. या बंदरामुळे निर्यात क्षमता वाढणार आहे. ग्लोबल सप्लाय चेनचा भाग आपण आता झालो आहोत, असे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. आमदार महेश बालदी हे अतिशय अभ्यासू लोकप्रतिनिधी आहेत. त्यांनी अतिशय कल्पकतेने मतदारसंघात दर्जेदार व उत्कृष्ट विकासकामे केली आहेत. त्यांच्या प्रत्येक विकासकामासाठी पुरेसा निधी आणि आवश्यक ते सर्व सहकार्य करण्यात येईल. उरणच्या विकासाकरिता सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाहीदेखील उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी या वेळी दिली.

पालकमंत्री उदय सामंत म्हणाले की, मच्छिमारांचे प्रश्न सोडविण्यासाठी आमदार महेश बालदी सातत्याने आग्रही असतात. उरणमध्ये सर्वसमावेशक विकासकामांना प्राधान्य देण्यात आले आहे. उरणच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्याचे काम आमदार बालदी यांनी केले आहे. उरणच्या विकासासाठी जिल्हा वार्षिक नियोजनाच्या माध्यमातून निधी देण्यात येईल, असेही त्यांनी या वेळी सांगितले.

खासदार श्रीरंग बारणे यांचे समयोचित भाषण झाले. प्रास्ताविकात आमदार महेश बालदी यांनी नवी मुंबई विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव देण्याच्या मागणीचा पुनःरूच्चार केला.

या वेळी ११ कोटी रुपये खर्चून उभारण्यात आलेले उरण नगर परिषद प्रशासकीय भवन, ४.३५ कोटी खर्चाचे सावित्रीबाई फुले फुल मार्केट, ४.१० कोटी खर्चाचे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन आणि समाज विकास केंद्र, दोन कोटी ५३ लाख खर्चाचे चारफाटा मच्छीमार्केट यांचे लोकार्पण तसेच उरण येथे ८२.५४ कोटी रुपये खर्चून उभारण्यात येणाऱ्या श्रेणीवर्धित उपजिल्हा रुग्णालयाचे भूमिपूजन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आणि अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. दरम्यान, उपमुख्यमंत्र्यांनी उरण येथील हत्या झालेल्या यशश्री शिंदे हिच्या घरी जाऊन कुटुंबियांप्रती संवेदना व्यक्त केल्या.

उरण : कोल्ही कोपर येथील सामाजिक कार्यकर्ते रूपेश धुमाळ यांनी समर्थकांसह उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. प्रवेशकर्त्यांचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी स्वागत करत शुभेच्छा दिल्या.

आगरी समाजाच्या उन्नतीसाठी एकजुटीने पुढे जाण्याचा निर्धार

प्रत्येक समाज आपापल्या संघटना बळकट करत आहेत. आम्हीही आमची आगरी समाजाची संघटना एकसंघ मातृसंस्था म्हणून अखिल आगरी समाजाच्या व्यासपीठावर एकत्र आणण्याचा हा पहिला प्रयत्न केला आहे. समाजातील नवतरुणांमध्ये जागृती व्हावी याकरिता या मेळाव्याचे आयोजन केले असल्याचे मत परिषदेचे अध्यक्ष दशरथ पाटील व्यक्त केले.

लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणाले की, प्रकल्पग्रस्तांचे झुंझार नेते दिवंगत दि.बा. पाटीलसाहेबांचे नाव विमानतळाला देण्यात यावे यासाठी जो संघर्ष इथल्या भूमिपुत्रांनी आणि स्थानिक प्रकल्पग्रस्तांनी केला, त्यामुळेच या आंदोलनाला मोठ्या प्रमाणात यश येताना दिसतंय.

आधीपासूनच समाज कष्टाने स्वाभिमानाने जगत राहिला, परंतु समाजाच्या कथा व्यथा या सर्व मांडण्याकरिता अखिल आगरी समाज परिषदचे व्यासपीठ निर्माण झाले, ही अभिमानाची गोष्ट आहे, असे गौरवोद्गार आमदार गणेश नाईक यांनी काढले.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी मनोगत व्यक्त करताना म्हटले की, आपण ज्या ज्या परिसरात राहतो त्या परिसराचे संदर्भ आणि प्रश्न बदलत चाललेले आहेत. समाज हा वेगवेगळ्या समाजामध्ये काम करणाऱ्या आपणा सर्वांच्या धडपडणाऱ्या आणि त्याचबरोबर चळवळ आंदोलनाच्या मार्गामध्ये पुढे जाणाऱ्या आपल्या सर्व सहकाऱ्यांमुळे समाज अधिकाधिक व्यापक आणि मोठा होत चाललेला आहे. आपण आज ज्या गावात बसलोय ती भूमी क्रांतीची आहे. या भूमीने १९८४ सालच्या आंदोलनाची धग पाहिलेली आहे. लोकनेते दि.बा. पाटीलसाहेबांच्या नेतृत्वाखाली सिडकोच्या विरोधातील आंदोलन आणि आंदोलनामुळे दि.बा. पाटीलसाहेबांचा लढा महाराष्ट्राच्या सीमारेषा ओलांडून पलीकडे गेला. या आंदोलनामुळे जे साडेबारा टक्के विकसित भूखंड भूमिपुत्र व प्रकल्पग्रस्तांना द्यायचे तत्व प्रस्तापित झाले आणि त्यामुळे पाटीलसाहेबांचे नेतृत्व आणि समाजाचा लढा साता समुद्रापलिकडे जाऊन पोहचला त्यातून आगरी समाजाची संघर्षशील प्रवृत्ती अधिक ठळक झाली. आपल्याला साहेबांनी एक मंत्र दिलाय की, लढल्याशिवाय मिळत नाही आणि लढणे हे थांबवायचे नसते. समाजाच्या मागण्यांसाठी व प्रगतीसाठी जोमाने वाटचाल करूया. अन्य उपस्थित वक्त्यांनीही आपले विचार व्यक्त केले. या वेळी आगरी दर्पण या मासिकाचे प्रकाशन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते झाले.

निवडक

तरुणीचा विनयभंग; गुन्हा दाखल

पनवेल : तालुक्यातील भाताण येथील ॲमेटी युनिव्हर्सिटीमध्ये शिक्षण घेत असलेल्या २१ वर्षीय तरुणीचा विनयभंग केल्याप्रकरणी एका मुलाविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पीडित तरुणी ही ॲमेटी युनिव्हर्सिटीच्या सेमिनार हॉलमध्ये तिसऱ्या रोमधील खुर्चीवर बसलेले होती. या वेळी तिच्या मागे बसलेला एका मुलाने तिचा विनयभंग केला. या प्रकरणी पीडित तरुणी तिच्या वडिलांसह पनवेल तालुका पोलीस ठाण्यात आल्यानंतर आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

लाभाचे आमिष दाखवून फसवणूक

पनवेल : अर्थ फायनान्स कंपनीत व इतर स्कीममध्ये पैसे गुंतवून १२० टक्के वार्षिक रिटर्न मिळवून देण्याचे आमिष दाखवून ७६ लाख तीस हजारांची फसवणूक केल्याप्रकरणी अनिकेत कुलकर्णी (रा. बाणेर, पुणे) याच्या विरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला. गीता गोरे या खांदा कॉलनी येथे राहत असून त्यांच्या घरी अनिकेत कुलकर्णी आले. त्यांनी अर्थ फायनान्स कंपनीची माहिती त्यांना दिली. कुलकर्णी यांनी अर्थ फायनान्स यात रक्कम गुंतवण्यासाठी ४८ लाख ३० हजार रुपये घेतले तसेच बिदिशा मुख्यपाध्याय यांच्याकडून २२ लाख तर डॉ. संदीप शिंदे यांच्याकडून सहा लाख असे ७६ लाख ३० हजार रुपये घेतले आणि ते पैसे परत दिले नाहीत. त्यामुळे अनिकेत कुलकर्णी याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

सुरदास राऊत सेवानिवृत्त

उरण : तालुक्यातील पी.पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटीचे प्राचार्य सुरदास जनार्दन राऊत हे ३४ वर्षाची प्रदीर्घ सेवा बजावत नियत वयोमानानुसार ३१ ऑगस्ट रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. चिरनेर येथील पी.पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटीच्या सभागृहात, पी.पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष पांडुरंग खारपाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या सेवापूर्ती व सन्मान सोहळा कार्यक्रमात प्राचार्य सुरदास राऊत यांना निरोप देऊन, पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

ॲल्युमिनियमच्या पॅनलची चोरी

पनवेल : बांधकाम चालू असलेल्या ठिकाणावरून ॲल्युमिनियमच्या पॅनलची चोरी केल्याप्रकरणी चोराविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुरा दाखल करण्यात आला. श्रीनिवास अडप्पा हे एल अँड टी कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड कंपनीमध्ये ॲडमिन इन्चार्ज म्हणून काम करतात. नावडे येथे चालू असलेल्या बांधकामाच्या ठिकाणी ॲल्युमिनियम पॅनल ठेवले होते. २९ ऑगस्ट रोजी ॲल्युमिनियम पॅनलचे सात नग कमी आल्याचे दिसून आले. रेल्वे स्टेशन जवळ सेक्टर ४०, नावडे कॉलनी येथून ७० हजार रुपये किमतीचे अल्युमिनियमचे पॅनल चोराने चोरून नेले.

उरण : राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस लोकार्पण व भूमिपूजन सोहळ्यावेळी आले असता त्यांचे राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष परिक्षीत ठाकूर यांनी नागाव ओएनजीसी हेलीपॅडवर स्वागत केले.

सण-उत्सवात कायदा, सुव्यवस्था राखा

मोहोपाडा : प्रतिनिधी

रसायनी पोलीस ठाण्याच्या आवारात खालापूर उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम, रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली गणेशोत्सव, ईद-ए-मिलाद या संदर्भात शांतता कमिटी, दक्षता कमिटी, पोलीस पाटील, सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे पदाधिकारी यांची समन्वय बैठक शनिवारी (दि. ३१) सायंकाळी रसायनी पोलीस ठाण्यात आयोजित करण्यात आली होती.

या वेळी उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, ७ सप्टेबर रोजी गणेशोत्सव साजरा होणार असून रसायनी पोलीस ठाणे हद्दित एकूण २२ सार्वजनिक मंडळ तसेच घरगुती गणेशोत्सव सन साजरा होणार आहे.

याकरीता मंडळांनी स्टेज व्यवस्था मजबूत असणारी असावी, सजावटीमध्ये देखावे सादरीकरणामुळे कोणाच्या ही भावना दुखावतील असे देखावे नसावेत, सना वेळी अन्न पदार्थ चांगल्या दर्जाचे वापरा, डी.जे.चा वापर शक्यतो टाळावा त्याऐवजी स्पिकर वापरा, परंतु त्याच्या ही ध्वनी हा नियमाप्रमाणे असावे, रसायनी परिसरात एकूण पाच ते सहा गणपती विसर्जन स्थळे आहेत. याठिकाणी कोणत्याही प्रकारे अनुचित प्रकार घडणार नाही, याची काळजी घेत स्वयंसेवक तैनात ठेऊन महिलांची काळजी घ्यावी, मंडळांनी संबंधित विभागातील परवानगी घेऊन पोलीस ठाणे येथे ५ सप्टेंबरपर्यंत नियमानुसार अर्ज देऊन परवानगी घ्यावी, तसेच विद्युत जोडणी ही विद्युत विभागातून घ्यावी, जेणेकरून कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही याची खबरदारी घ्यावी व आवश्यक सुरक्षेच्या दृष्टीने आपल्या परिसरात कोणताही अनुचित प्रकार घडू नये याची खबरदारी मंडळाने नागरिकांनी घेऊन कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आपण दक्ष राहवे, असे सांगत आनंदाने सन साजरा करण्यासाठी उपस्थितांना शुभेच्छा दील्या.

या वेळी कृष्णा पारंगे यांनी मोहोपाडा बाजारपेठ येथे धिम्यागतीने रस्त्याचे काम सूरू असून वाहतुक कोडी मोठ्या प्रमाणात होत आहे. यावर उपाययोजना करून वाहतुक कोडी सुरळीत होण्यासाठी उपाययोजना करावी. ही समस्या उपविभागीय अधिकारी विक्रम कदम यांच्या निदर्शनास आणून दिली. या वेळी उपस्थितांनी विविध समस्या मांडल्या यावर वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय बांगर यांनी मार्गदर्शन केले.

या समन्वय बैठकीत रसायनी पोलीस ठाणे हद्दितील २२ मंडळांचे पदाधिकारी, पोलीस पाटील, शांतता कमिटी सदस्य, राजकीय पक्षाचे प्रतिनिधी आदी उपस्थित होते.

१० वर्षांपासून आनंदोत्सव परंपरा

दरम्यान, मागील १० वर्षांपासून परिसरात सण हे कोणताही अनुचित प्रकार न घडता मोठ्या आनंदाने साजरे झालेले असून या वेळी ही आम्ही रसायनीकर कायदा सुव्यवस्था राखत सण साजरे करणार, असा विश्वास पोलीस व रसायनीकर समन्वय बैठकीत व्यक्त केला.

नंदेश पाटील यांचा सेवापूर्ती समारंभ

पनवेल : रामप्रहर वृत्त

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालयाचे आदर्श शिक्षकेतर सेवक पुरस्कार प्राप्त वरिष्ठ लिपीक नंदेश पाटील यांचा सेवापूर्ती समारंभ शनिवारी (दि. ३१) सीकेटी विद्यालयात आयोजित करण्यात आला होता.

नंदेश पाटील यांचा संस्थेच्या वतीने एक लाख रुपयाचा धनादेश आणि सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी नंदेश पाटील यांनी संस्थेत केलेल्या सेवेचं कौतुक करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, सचिव डॉ.एस.टी. गडदे, कार्यकारी मंडळ सदस्या वर्षा ठाकूर, रायगड जिल्हा परिषद अलिबाग प्राथमिक विभाग शिक्षण निरीक्षक संतोष शेडगे, रायगड जिल्हा परिषद अलिबाग प्राथमिक शिक्षण विभाग लिपीक अभिजित पालवे, सीकेटी विद्यालयाचे मुख्याध्यापक कैलास सत्रे, नंदेश पाटील यांचे वडील विश्वनाथ पाटील, आई प्रभावती पाटील, हर्षदा म्हात्रे, सीकेटी विद्यालयाचे पर्यवेक्षक कैलास म्हात्रे तसेच सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

क्रेडिट कार्डच्या बहाण्याने गंडा

पनवेल : रामप्रहर वृत्त

क्रेडिट कार्ड इशू झाले असल्याचे सांगून बँक खात्यातून दहा लाख रुपये वळते करून घेतल्याप्रकरणी आरोपी विरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

यातील फिर्यादी या खारघर येथे राहत असून त्या नैनामध्ये उपअधीक्षक भूमी अभिलेख या पदावर नोकरी करतात. २८ ऑगस्ट रोजी त्यांना अनोळखी व्यक्तीने कॉल करून क्रेडिट कार्ड इशू झाल्याचे सांगितले. त्यांनी क्रेडिट कार्ड नको आहे ते कॅन्सल करा असे सांगितले, मात्र समोरील व्यक्तीने त्यांना क्रेडिट कार्डची लिमिट पाच लाख रुपये असल्याचे सांगून जन्मतारीख, पत्ता, ईमेल आयडी सांगितला. त्यामुळे त्यांचा त्याच्यावर विश्वास बसला. क्रेडिट कार्ड कॅन्सल करण्याबाबत सांगितले असता प्रोसिजर करतो असे सांगून कॅन्सलची एनओसी तुमच्या पत्त्यावर येईल असे सांगितले. त्यावेळी ॲक्सिस बँक खात्याशी जोडलेला मोबाईल नंबर यावर आलेला ओटीपी नंबर त्या इसमाने त्यांच्याकडून बोलता बोलता घेतला. टाईम संपल्याने दुसरा ओटीपी नंबर सांगण्यास सांगितले. यावेळी त्यांनी त्या व्यक्तीला तो ओटीपी दिला व क्रेडिट कार्ड कॅन्सल होईल असे सांगून मोबाईलवर फोन येईल आणि मेल येईल असे सांगितले. त्यांच्या बँक खात्यावरून ५९८ क्रेडिट कार्ड करता कट झाले ते पैसे परत खात्यावर येतील व रिवार्ड पॉईंटचे पैसे बँक खात्यावर येथील असे सांगून क्रेडिट कार्ड कायमचे बंद करण्यात आले असल्याचे सांगितले. त्यानंतर पुन्हा त्या व्यक्तीचा फोन येत होता.

या वेळी ॲक्सिस बँकेच्या हेल्पलाइन नंबर वर फोन करून क्रेडिट कार्डबाबत व बँक खात्याबाबत विचारणा केली असता ॲक्सिस बँक खात्यातून दहा लाख रुपये विथड्रॉल झाल्याचे सांगितले.

सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयात दंतचिकित्सा शिबिर

पनवेल : रामप्रहर वृत्त

रयत शिक्षण संस्थेच्या उलवे येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयात संकल्प सेवा समिती मार्फत मोफत दंतचिकित्सा शिबिराचे आयोजन शनिवारी (दि. ३१) करण्यात आले होते.

शासन मान्यताप्राप्त संकल्प सेवा समितीचे अध्यक्ष नितीन सावंत त्यांच्या समवेत वाय.एम.टी. डेंटल कॉलेज अँड हॉस्पिटलचे डॉक्टर्स अनुष्का बारहाटे, वैष्णवी राऊत, श्रेय पटेल, अमोल पाटील व उत्प्रेक्षा मॅडम विद्यालयात उपस्थित होत्या. यांनी आठवी ते दहावीतील विद्यार्थ्यांच्या दातांची चिकित्सा करून विद्यार्थ्यांच्या पालकांसाठी व विद्यार्थ्यांसाठी मोफत उपचाराचे कार्ड्स वितरित केले. विद्यार्थ्यांना दातांची निगा राखण्याची पद्धती समजावून सांगितली. विद्यालयाच्या उपशिक्षिका विशाखा गावंड, पल्लवी पवार, वेदांगी म्हात्रे, आशा कसपटे, क्लार्क भारती कोळी व विद्यार्थ्यांनी या मोफत दंतचिकित्सेचा लाभ घेतला.

विद्यालयाच्या मुख्याध्यापिका व रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या ज्योत्स्ना ठाकूर यांनी संकल्प सेवा समिती बरोबर संपर्क करून शिबिराचे आयोजन केले होते.

फुंडे हायस्कूलमध्ये शालेय विद्यार्थी प्रतिनिधी निवडणूक

उरण : रामप्रहर वृत्त

रयत शिक्षण संस्थेचे फुंडे येथील तुकाराम हरी वाजेकर विद्यालय शनिवारी (दि. ३१) आनंददायी शनिवार या उपक्रमांतर्गत विद्यार्थी प्रतिनिधी निवडणूक घेण्यात आली. आजचे विद्यार्थी हे उद्याचे सुजाण भारतीय नागरिक आहेत.

या अनुषंगाने विद्यार्थ्यांना निवडणूक प्रक्रिया कशी असते, तसेच योग्य उमेदवार कशा पद्धतीने निवडून दिला जातो या बाबींचे ज्ञान मिळावे म्हणून विद्यालयाचे प्राचार्य एम. जी. म्हात्रे यांनी या निवडणूक प्रक्रियेचे दहावी वर्ग शिक्षक आर. जी. शेळके, आर. एन. पाटील, एस. डी. नाईक, जे. ए. देवरे या वर्ग शिक्षकांच्या सहकार्याने अत्यंत सुंदर नियोजन केले होते. दहावीतील दोन विद्यार्थिनी वीरश्री महेश म्हात्रे आणि श्रावणी जयदास कोळी आणि दोन विद्यार्थी नचिकेत म्हात्रे आणि वैभव गुट्टे असे एकूण चार विद्यार्थी उमेदवार म्हणून उभे राहिले होते. त्यांना निवडणुकीसाठी स्वतःची निशाणी देऊन या चारही विद्यार्थ्यांनी प्रत्येक वर्गात जाऊन आपण कसे योग्य उमेदवार आहोत याचा प्रचार केला. यासाठी विद्यालयात जाहीर प्रचार सभादेखील घेण्यात आली.

पाचवी ते दहावी अखेरच्या सर्व विद्यार्थ्यांना या निवडणूक प्रक्रियेची माहिती विद्यालयाचे प्राचार्य एम. जी. म्हात्रे व आर जी शेळके यांनी व्यवस्थितरित्या समजावून सांगितली. या वेळी ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख व्ही. के. कुटे आणि सर्व सेवक वृंद व विद्यार्थी उपस्थित होते.

निवडणूक प्रक्रिया झाल्यानंतर लगेचच मतदान मोजणी करण्यात आली. शिक्षकांनी मतदान मोजणी केली व यामध्ये विद्यार्थिनी प्रतिनिधी म्हणून श्रावणी कोळी आणि विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून नचिकेत म्हात्रे हे बहुमताने निवडून आले आणि त्यांना विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून विजयी घोषित करण्यात आले. विद्यालयाचे प्राचार्य, सर्व शिक्षक वृंद आणि विद्यार्थ्यांनी विजयी उमेदवारांचे अभिनंदन केले.

सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये गणेशमूर्ती कार्यशाळा

पनवेल : रामप्रहर वृत्त

उलवे येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर सीबीएसई स्कूलमध्ये आनंददायी शनिवारी (दि. ३१) हा उपक्रम राबवण्यात आला. ज्यामध्ये शाडू माती पासून गणपतीची मूर्ती बनवण्याची कार्यशाळा घेण्यात आली.

या कार्यशाळेत पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. यासाठी अरुण गजानन कुंभार (रा. उलवे) या मूर्तिकारांना प्रशिक्षण देण्यासाठी बोलवण्यात आले होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व विद्यार्थ्यांनी मातीपासून अतिशय सुंदर आणि उत्कृष्ट गणपतीची मूर्ती तयार केली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या मनात कलेची आवड निर्माण व्हावी तसेच

त्यांना आपले कौशल्य दाखवता यावे हा उद्देश होता. अरुण कुंभार यांनी विद्यार्थ्यांना गणपतीची मूर्ती बनवण्याचे कौशल्य शिकविले त्यामुळे त्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळाला व सर्व विद्यार्थी आनंदीत झाले. शाळेच्या मुख्याध्यापिका मुक्ता खटावकर यांनी सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक केले तसेच त्यांना प्रोत्साहन दिले.

विद्यार्थ्यांनी साकारला बाप्पा!

पनवेल : रामप्रहर वृत्त

पनवेलमधील पर्यावरण दक्षता मंचच्या वतीने गणेशमूर्ती बनविण्याची कार्यशाळा शहरातील श्रीमती इंदूबाई वाजेकर, इंग्रजी माध्यम या विद्यालयात आयोजित करण्यात आली होती. या वेळी माजी नगरसेविका दर्शना भोईर यांनी कार्यशाळेतील सहभागी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले.

या कार्यशाळेवेळी शिक्षक तनय दीक्षित, स्मित राऊत, विरेंद्र मोरे, रीना शिवकर, अफरीन पठाण, सरचिटणीस उल्हास ठाकूर, सहाय्यक सुरेश रिसबुड, अरविंद गोडबोले, प्रल्हाद बोडके, मुख्याध्यापिका मानसी कोकीळ, मनिषा पाटील, चेअरमन विष्णू म्हात्रे यांचे सहकार्य लाभले.

दीपक घोसाळकर यांचा सेवापूर्ती सोहळा

पनवेल : रामप्रहर वृत्त

कळंबोलीमधील सुधागड विद्या संकुलातील कनिष्ठ लिपीक दीपक घोसाळकर यांचा सेवापूर्ती सोहळा मराठी विभगाच्या मुख्याध्यापिका हेमलता पाटील यांनी आयोजित केला होता. या वेळी प्रशासकीय अधिकारी मिलिंद जोशी यांनी मनोगतामध्ये घोसाळकर यांची सेवापुर्ती नसून त्यांना समाजसेवेची दिलेले संधी आहे, असे म्हटले.

शिक्षण अधिकारी नवनाथ साबळे यांनी सांगितले, घोसाळकर यांनी जी त्यांच्या कार्यकाळात सेवा केलेली आहे नक्कीच ती सुधागड आणि पनवेल तालुका रायगड जिल्हात नोंद घेण्याचे सेवा त्यांनी केलेली आहे.

सोहळ्यावेळी इयत्ता पहिली, दुसरी आणि तिसरीतील शिक्षकांनी दीपक घोसाळकर यांच्या जीवनवर आधारित अशी गीते सादर केली. मुख्याध्यापिका हेमलता पाटील आणि सहकाऱ्यांनी घोसाळकर हे सोनार असल्यामुळे पैशांचा हार आणि चॉकलेट हार अर्पण केला.

या कार्यक्रमासाठी सुधागड एज्युकेशन सोसायटीचे आणि दीपक घोसाळकर यांचे बंधू रवी घोसाळकर, संस्थेचे संचालक आणि विद्या संकुलाचे प्राचार्य राजेंद्र पालवे, संत साई बाबा शाळेच्या मुख्याध्यापिका वैशाली पाटील, कळंबोली संकुलाचे उपमुख्याध्यापक सुरेश शिंदे, यांच्यासह शाळेचे आजी माजी मुख्याध्यापक, घोसाळकर यांचे नातेवाईक, मित्र परिवार आणि पत्रकार मित्र मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संपादकीय

महिला सशक्तीकरणास प्राधान्य

मुलगी शिकली आणि स्वतःच्या पायावर उभी राहिली तर ती वैयक्तिक उन्नती तर साधतेच, त्याचबरोबर कुटुंबाचाही उत्कर्ष साधू शकते. शिवाय राष्ट्र उभारणीतदेखील योगदान देऊ शकते. म्हणूनच देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महिला सशक्तीकरणास प्राधान्य दिलेले आहे. राज्य सरकारही त्याच दिशेने आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी नुकतेच पालघरमधील वाढवण येथे बंदर प्रकल्पाच्या पायाभरणी समारंभास आले होते. त्यांनी या वेळी महिला विकास व सशक्तीकरणाच्या मुद्द्याचा आवर्जून उल्लेख केला. पंतप्रधानांनी नेहमीच नारीशक्तीला प्राधान्य दिलेले आहे. महिलांची प्रगती व्हावी यासाठी विविध योजना, उपक्रम, निर्णय केंद्र सरकारमार्फत वेळोवेळी उपकृत केले जातात. लखपती दिदी योजना हीसुद्धा महिला आत्मोन्नतीचा एक भाग आहे. गेल्या वर्षी स्वातंत्र्याच्या वर्धापन दिनी लाल किल्ल्यावरून देशाला संबोधित करताना पंतप्रधान नरेंद्र मोदींनी लखपती दिदी संकल्पनेवर भाष्य केले होते. सरकारने महिला बचत गटांसोबत दोन कोटी लखपती दिदी निर्माण करण्याचे उद्दिष्ट आहे. लखपती दिदींचे वार्षिक उत्पन्न किमान एक लाखापेक्षा जास्त होण्यासाठी त्यांना दोन किंवा दोनपेक्षा अधिक व्यवसाय संधी निर्माण करून दिल्या जात आहेत. केंद्राच्या पावलावर पाऊल टाकत महाराष्ट्र सरकारही विविध योजना महिलांसाठी राबवत आहेत. त्यापैकी सध्या चर्चेत असलेली मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेस उदंड प्रतिसाद लाभत आहे. या योजनेंतर्गत पात्र लाभार्थी महिलेस प्रति महिना दीड हजार रुपये रक्कम मिळत आहे. राज्याच्या अर्थसंकल्पात याची घोषणा करण्यात आली होती. त्यानंतर लगोलग आवश्यक ती प्रक्रिया पूर्ण करून महिलांना लाभ देण्यास सुरुवातदेखील करण्यात आली. महिला सबलीकरण धोरण ठरविणारे महाराष्ट्र हे देशातील अग्रेसर राज्य आहे. माझी कन्या भाग्यश्री, लेक लाडकी या मुलींसाठी योजनेनंतर महिला सक्षमीकरणाला चालना देण्यासाठी राज्य सरकारने सुरू केलेल्या लाडकी बहीण या महत्त्वाकांक्षी योजनेमुळे महिलांचे आर्थिक स्वातंत्र्य, त्यांच्या आरोग्य व पोषणात सुधारणा होण्यासोबतच कुटुंबात त्यांची निर्णायक भूमिका ठाम होण्यास मदत होणार आहे. दुर्गम ग्रामीण भागात पुरुषाशिवाय कुठलेच काम न करू शकणाऱ्या महिलांच्या आयुष्यात या योजनेतून स्वावलंबनाचा, स्वाभिमानाचा आणि स्वनिर्णयाचा नवा अध्याय सुरू होणार आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी नागपूर येथे झालेल्या कार्यक्रमात या योजनेचे कौतुक केले. त्याचबरोबर यासाठी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांसह सरकारचे अभिनंदन केले. या योजनेशिवाय अन्नपूर्णा योजनेंतर्गत तीन गॅस सिलिंडर देण्याची योजना, महिलांना प्रवासात सवलत, मुलींना उच्च शिक्षण मोफत, महिला स्टार्टअप योजना इत्यादी राबविण्यात येत आहेत. दुसरीकडे मुली, महिलांवर होणाऱ्या अत्याचाराच्या घटनांवर परिणामकारकरित्या आळा घालण्याच्या दृष्टीने व त्यांच्या सुरक्षिततेसंदर्भात उपाययोजना करण्यासाठी पावले उचलली जात आहेत. बिकट प्रसंगात तातडीने पोलीस मदत मिळण्यासाठी हेल्पलाईन जारी करण्यात आल्या आहेत. शाळा व महाविद्यालय परिसरात, गर्दी व निर्जनस्थळी दामिनी पथकांद्वारे रस्ते गस्त, दुचाकी, चार चाकी वाहनांद्वारे पेट्रोलिंग करून गुन्ह्यांना प्रतिबंध केला जात आहे. निर्भया पथक, भरोसा सेल यासारखे उपक्रमही राबविण्यात येत आहे. महिलांवरील अत्याचाराच्या गुन्ह्यांसाठी न्यायदान प्रक्रिया जलदगतीने होण्यासाठी कार्यवाही करण्यात येत आहे. अशा प्रकारे महिला सशक्तीकरण तसेच संरक्षण या दृष्टीने कार्यवाही केली जात आहे, कारण अनादी कालापासून नारीशक्ती महत्त्वाची आहे. ती जर सक्षमपणे पुढे गेली तर समाजाची प्रगती कुणीही रोखू शकत नाही.

शहरातील वाहतूक कोंडीतून कर्जतकरांची सुटका व्हावी!

खबरबात
विजय मांडे

कर्जत शहरात वाहतूक कोंडी होण्याचे कारण म्हणजे कुठेही उभ्या करण्यात येणाऱ्या रिक्षा आणि बाजारपेठेतील दुतर्फा असलेले हातगाडीवाले आणि फेरीवाले. या सर्वांच्या मुळे कर्जतच्या बाजारपेठेतूनच नव्हे तर शहरातून चालणे कठीण होत आहे. त्यांच्यावर कुणाचाच वचक नाही. असा सूर कर्जतकरांकडून ऐकायला मिळतो, परंतु अनेकजण याबाबतीत पाठपुरावा करतात त्याला यश येत नाही. दिवसेंदिवस शहरातील वाहतुक कोंडी डोकेदुखी ठरत आहे. आता तर गणपतीचा सण आला आहे. त्यामुळे खरेदीसाठी दोन्ही बाजारपेठांमध्ये खूप गर्दी होत आहे. त्याचे कारण संबंधीत अधिकाऱ्यांची मानसिकता.

कर्जत ग्रामपंचायत असताना रस्ते फार लहान होते. ते रुंदीकरण करण्याचे काम माजी आमदार स्वर्गीय तुकाराम सुर्वे यांनी हाती घेतले होते. त्यावेळी त्यांना खूप विरोध झाला होता. त्याला न जुमानता रस्ते थोडेसे रुंद झाले, मात्र त्याचा काही उपयोग झाला नाही. कारण हे रस्ते त्यावेळीदेखील म्हणजे पस्तीस-चाळीस वर्षांपूर्वी हातगाडीवाल्यांनी काबीज केले होते. त्यानंतर कर्जत ग्रुप ग्रामपंचायत आणि दहिवली ग्रामपंचायतीची एकत्रित कर्जत नगर परिषद जाहीर झाली. ही घटना १९९२ सालची. त्यानंतर १९९४ साली झालेल्या पहिल्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाची सत्ता आली. त्यानंतर १९९९ साली काँग्रेसमध्ये फूट पडून राष्ट्रवादी काँग्रेसची निर्मिती करण्यात आली. त्यावेळी झालेल्या निवडणुकीत सुरेश लाड आमदार झाले.

माजी आमदार स्व. तुकाराम सुर्वे यांनी चाळीस वर्षांपूर्वी रस्ता रुंदीकरण करण्याची सुरुवात केली. त्यावेळी अनेकांनी त्यांना विरोध केला. तरीही त्यांनी रुंदीकरण केले. त्यानंतर सुरेश लाड यांनी आपल्या आमदारकीच्या काळात शहरातील रस्ते काँक्रीट करण्यासाठी निधी उपलब्ध करून दिला व शहरातील रस्ते रुंद करण्यासाठी स्वतः लक्ष घातले. त्यावेळीही व्यापारी वर्गाने नाराजी दाखविली होती. त्यांना समजावून तर काहींचा विरोध पत्करून त्यांनी दोन्ही बाजारपेठा व शहरातील काही रस्त्यांचे रुंदीकरण घडवून आणले. रस्ते मोठे झाले मात्र त्याचा काही उपयोग झाला नाही. बाजारपेठेतील रस्त्यांच्या दुतर्फा हातगाडी व फेरीवाल्यांनी ठाण मांडले. खरे तर नगर परिषद परवाना असलेल्या हातगाड्या किती? आणि प्रत्यक्षात हातगाड्या किती? हा म्हणजे संशोधनाचा विषय आहे. त्यांच्यावर ठोस कारवाई केल्याचे ऐकिवात नाही. कुणीतरी विरोध केला की, तात्पुरती मलमपट्टी करण्याचे प्रकार होत असतात, मात्र काही दिवसांनी जैसे थे परिस्थिती होते.

कपालेश्वर मंदिर ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा दरम्यानच्या रस्त्यावर नो हॉकर्स झोन करण्याचे ठरले होते. त्यानंतर त्या रस्त्यावर हातगाडीला बंदी घालण्यात आली होती. हा ठराव करताना त्यावेळी जे नगरसेवक होते. त्यातील दोन-तीन नगरसेवक आत्ता दोन-तीन टर्म नगर परिषदेत होते, मात्र याबाबत ते काहीही करू शकत नाहीत. मध्यंतरी या रस्त्यावरील फेरीवाल्यांवर कारवाई करून त्यांना उठवण्यात आले होते, मात्र मतांच्या राजकारणासाठी त्यामध्ये राजकीय हस्तक्षेप झाला आणि ही कारवाई 'औटघटकेची' ठरली. आता तर त्या रस्त्यावरून चालणेही कठीण होऊन बसले आहे. आम्ही ज्यांना निवडून दिले. त्यांनी हे काम केले पाहिजे. अशी उघड चर्चा नेहमीच होत असते, परंतु त्याकडे दुर्लक्ष केले जाते.

फेरीवाले, हातगाडीवाले रस्त्यावर बसतात त्यात भर म्हणून शासनाने रिक्षा परवाने खुले केले होते. त्यामुळे अनेक बेरोजगार युवक रिक्षा व्यवसायात पडले. रस्ते तेच मात्र वाहनांची संख्या दुप्पट, तिप्पट झाल्याने त्यांचे नियोजन करता करता पोलीस कर्मचाऱ्यांची दररोज कसरत होते. कर्जत शहरात कोणत्याही चौकात मोकळी जागा नाही. सर्वच ठिकाणी रिक्षावाले अगदी बिनदिक्कतपणे रिक्षा उभ्या करतात. एक आहे ज्यावेळी आरटीओंचा कॅम्प असतो तेव्हा यातील काही रिक्षा आडबाजूला लावल्या जातात. याकडेही दुर्लक्ष केले जाते. काही महिन्यांपूर्वी टोविंग वॅन उपलब्ध होती, मात्र पोलीस प्रशासन आणि नगर परिषद प्रशासन याची जबाबदारी घेत नसल्याने ती बंद आहे. पोलीस ठाण्यात पोलीस कर्मचारीही कमी आहेत. त्यामुळे त्याचाही नाईलाज आहे. टोविंग वॅन सुरू असताना चांगली शिस्त लागली होती. वाहतूक कोंडीची समस्याही बऱ्या पैकी सुटली होती, मात्र आता सारे पुन्हा सुरू झाले आहे.

हातगाडी व फेरीवाले यांच्यासाठी एक वेगळेच ठिकाण ठरवून त्यांची व्यवस्था करायला हवी. कोरोनाच्या काळात या सर्वांना पोलीस मैदानात व्यवस्था करून दिली होती. त्यावेळी सर्वांना सोयीस्कर झाले होते. त्यावेळी दिवसाही बाजारातील रस्ता खूप मोठा आहे. हे पहायला मिळत होता. दुसरा उपाय म्हणजे चारचाकी गाड्या बाजारपेठेत येऊ न देणे. ठरवलेले एक दिशा मार्ग अंमलात आणणे. विशेष म्हणजे लोकमान्य टिळक चौकात असलेले कर्जत नगर परिषदेचे कार्यालय २०१३ साली नवीन इमारतीत आले, मात्र ती इमारत तशीच पडून आहे. त्या इमारतीच्या एका भागात ई-सेवा केंद्र सुरू आहे. तर दुसऱ्या बाजूची पडझड सुरू आहे. ती इमारत पाडून तेथे नवीन इमारत करून तळ मजला आणि पहिला मजला वाणिज्य वापरासाठी द्यावा व त्यावर बहु मजली पार्किंगची व्यवस्था केल्यास नगर परिषदेला उत्पन्न मिळेल आणि तरच शहरातील वाहतुकीची समस्या सुटू शकेल.

...म्हणून साजरा होतो जागतिक नारळ दिवस

दरवर्षी २ सप्टेंबर रोजी जागतिक नारळ दिन साजरा केला जातो. नारळाची बहुमुखी उपयुक्तता आणि त्याची मागणी लक्षात घेऊन, २ सप्टेंबर १९६९ रोजी एशियन आणि पॅसिफिक कोकोनट कम्युनिटी सुरू झाली. जकार्ता, इंडोनेशियात या दिवशी -झउउची स्थापनादेखील झाली.आपल्या देशात अनेक शतकांपासून नारळाचे आध्यात्मिक आणि औषधी मूल्य आहे. याला जर निसर्गाने दिलेली भेट म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही. नारळाच्या प्रत्येक भागाला खूप महत्त्व आहे. हे उशीरा पचवणारा, मूत्राशय साफ करणारा, ग्रहण करणारा, पौष्टिक, शक्तिशाली, रक्ताविरोधी, जंतुनाशक, जंतुनाशक आणि वात-पित्त नष्ट करणारा आहे. त्याच्या थंड प्रभावामुळे, त्याचे पाणी सर्व शारीरिक समस्यांपासून आराम देते.

नारळाच्या झाडाला कल्पवृक्ष म्हटलं जातं. त्यापासून निर्माण होणाऱ्या सगळ्या गोष्टी या मनुष्याला उपयोगी पडतात. नारळ हा त्यापैकीच एक. नारळाचा उपयोग खाण्यासाठी, ओषधांसाठी, तेलासाठी तसेच इतर अनेक गोष्टींसाठी केला जातो. नारळाच्या शेतीपासून जगातल्या अनेक देशांत चांगला रोजगार मिळत आहे. त्यामुळे नारळाचे महत्व आणि त्याचा वापर याबद्दल जागरुकता निर्माण करण्यासाठी दरवर्षी २ सप्टेंबर हा जागतिक नारळ दिन म्हणून साजरा केला जातो.

जागतिक नारळ दिन हा सर्वप्रथम २००९ साली एशिया-पॅसिफिक प्रदेश म्हणजे आशिया-प्रशांत महासागराच्या प्रदेशातील समुदायाकडून साजरा करण्यात आला. जागतिक स्तरावर नारळाच्या शेतीबद्दल जागरुकता निर्माण करणे आणि त्याला प्रोत्साहन देणे हा उद्देश जागतिक नारळ दिन साजरा करण्यामागे आहे. त्यामुळे नारळाच्या व्यापाराला मोठ्या प्रमाणात चालना मिळू शकेल. जगभरात नारळाचे उत्पादन घेतले जाते, पण आग्नेय आशियात त्याचे सर्वाधिक उत्पादन घेतलं जातं. नारळाच्या उत्पादनाच्या बाबतीत इंडोनेशियाचा जगात पहिला क्रमांक लागतो. भारतातही कोकण किनारी, गुजरात पासून ते केरळपर्यंत आणि पूर्व किनाऱ्याच्या पश्चिम बंगालपासून ते तामिळनाडूपर्यंत नारळाचे उत्पादन घेतलं जातं.

(साभार : इंटरनेट)

बदलते तंत्रज्ञान

आधार कार्डमधील माहिती घरबसल्या करा अपडेट!

अनेकांना आधार कार्ड काढून बरीच वर्षे झाली असतील. २०१६च्या नियमानुसार व्यक्तींनी त्यांच्या आधार नोंदणी तारखेपासून दर १० वर्षांनी आधार कार्ड अपडेट केले पाहिजे. हे ५ आणि १५ वर्षांच्या मुलाच्या ब्लू आधार कार्डवर बायोमेट्रिक माहिती अपडेट करण्यासाठीदेखील लागू होते. आता युनिक आयडेंटिफिकेशन ऑथॉरिटी ऑफ इंडियाने अलीकडेच मोफत आधार कार्ड अपडेट करण्याची व कागदपत्रे ऑनलाइन अपलोड करण्याची अंतिम मुदत १४ जून होती ती आता १४ सप्टेंबरपर्यंत वाढवली आहे.

नाव, पत्ता, जन्मतारीख, वय, लिंग, मोबाइल नंबर, ई-मेल पत्ता, रिलेशनशिप स्टेटस, इन्फॉर्मेशन शेरिंग कॉन्सेंट आदी गोष्टी तुम्ही अपडेट करू शकता.

अधिकृत वेबसाईटला भेट द्या : सगळ्यात पहिला UIDAI म्हणजे भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणच्या अधिकृत वेबसाइटवर uidai.gov.inवर जा. दिलेल्या पर्यायांमधून तुमच्या सोयीनुसार भाषा निवडा. ॲक्सेस अपडेट फिचर : 'माय आधार' टॅबवर क्लिक करा आणि ड्रॉप-डाउन मेनूमधून 'अपडेट युवर आधार' हा पर्याय निवडा. अपडेटसह पुढे जा : तुम्हाला 'अपडेट आधार डिटेल्स (ऑनलाइन)' पेजवर नेले जाईल. प्रक्रिया सुरू करण्यासाठी Document Updateवर क्लिक करा. युआयडी क्रमांक टाका : तुमचा युआयडी क्रमांक, कॅप्चा व्हेरिफिकेशन कोड तिथे टाका. तुमच्या नोंदणीकृत मोबाइल नंबरवर वन-टाइम पासवर्ड (OTP) येण्यासाठी 'ओटीपी पाठवा'वर क्लिक करा. लॉग इन करा : ओटीपी मिळाल्यानंतर लॉग इन करा. ओटीपी एंटर करा व अकाउंट एक्सेस करण्यासाठी 'लॉग इन'वर क्लिक करा. अपडेटेड माहिती भरा : तुम्हाला जी माहिती अपडेट करायची आहे ते निवडा व नवीन माहिती अचूक भरून घ्या. डॉक्युमेंट सबमिट करा : आवश्यक बदल केल्यानंतर 'सबमिट'वर क्लिक करा. तुमची माहिती अपडेट करण्यासाठी आवश्यक असलेले स्कॅन डॉक्युमेंट्स अपलोड करा. रिक्वेस्ट नंबर प्राप्त होईल : नंतर Submit Update Requestवर क्लिक करा. सबमिशन केल्यावर तुम्हाला एसएमएसद्वारे अपडेट रिक्वेस्ट नंबर (URN) प्राप्त होईल, जो तुम्ही अपडेट ट्रॅक करण्यासाठी वापरू शकता. ओरिजिनल कागदपत्रांच्या स्कॅन केलेल्या प्रती अपलोड करून १४ सप्टेंबरपर्यंत तुम्हाला my-adhaar पोर्टलवर विनामूल्य आधार कार्ड अपडेट करता येईल. त्यानंतर मात्र तुम्हाला शुल्क भरावे लागेल.

ख्यातनाम संगीतकार श्रीनिवास खळे

ख्यातनाम संगीतकार श्रीनिवास विनायक खळे यांचा आज स्मृतिदिन. त्यांनी आपल्या कर्णमधुर आणि भावपूर्ण गीतांनी मराठी रसिकांना सहा दशकांहून अधिक काळ मोहिनी घातली होती. ते खळेअण्णा या नावानेही ओळखले जायचे.

श्रीनिवास खळे यांचा जन्म ३० एप्रिल १९२६ रोजी गुजरातमधील बडोदा येथे झाला. पूर्वी दादरच्या एका चाळीतल्या जागेत खळे कुटुंब राहायचं. गावाकडच्या मालमत्ता वा तत्सम कारणांमुळे मुंबई सोडावी लागली. संपूर्ण कुटुंब बडोद्याला स्थायिक झालं. बडोद्यातल्या सयाजीराव गायकवाड संगीत महाविद्यालयातच मधुसूदन जोशी यांच्याकडून त्यांनी संगीताचे प्राथमिक शिक्षण घेतले. पुढे अता हुसेन खाँ, निसार हुसेन खाँ आणि फैयाज हुसेन खाँ यांच्यासारख्या दिग्गजांकडून त्यांना शास्त्रीय संगीताची तालीम मिळाली.

बडोदा आकाशवाणीत संगीतकार म्हणून काही वर्षे नोकरी केल्यानंतर खळेअण्णा मुंबईत आले, पण त्यांना काम मिळेना. या काळात त्यांना त्यांच्या एका मित्राची मोलाची मदत झाली. त्याच्यामुळे राहण्या-खाण्याची सोय झाली. इथेच त्यांची ओळख के. दत्ता (दत्ता कोरगावकर) या संगीतकाराशी झाली. खळ्यांनी मग कोरगावकरसाहेबांचे सहाय्यक संगीतकार म्हणून काम करायला सुरुवात केली. याच काळात काही चित्रपटाच्या संगीत दिग्दर्शनाच्या स्वतंत्र संधी त्यांच्याकडे

निमित्त

चालून आल्या, मात्र ते चित्रपट कधीच पूर्ण झाले नाहीत आणि खळेसाहेबांचे सगळे कष्ट पाण्यात गेले. त्यामुळे त्यांना विलक्षण नैराश्य आले होते. आपल्या जवळची बाजाची पेटी विकून टाकून संगीताला रामराम ठोकावा आणि काही तरी दुसराच नोकरीधंदा शोधावा अशा टोकाच्या निर्णयाप्रत ते आले होते, पण अशा वेळी त्यांच्या पत्नीने त्यांना धीर दिला आणि या प्रसंगातून त्यांना सुखरूप बाहेर काढले. बऱ्याच हालअपेष्टांनंतर १९५२ साली त्यांची 'गोरी गोरी पान' आणि 'एका तळ्यात होती बदके पिले सुरेख' दोन गाणी असलेली पहिली तबकडी प्रसिद्ध झाली. आशा भोसले यांची तिच्यातील ही गीते तेव्हा खूप लोकप्रिय झाली आणि त्याबरोबर श्रीनिवास खळे हे नावदेखील. या दोन्ही रचना ग.दि. माडगुळकर यांच्या होत्या. मुळात या रचना लक्ष्मीपूजन चित्रपटासाठी होत्या, पण ऐनवेळी हा चित्रपट मूळ निर्मात्याऐवजी दुसऱ्याच एका निर्मात्याने बनवून त्यात संगीतकार म्हणून खळ्यांना घेतलेच नाही, पण खळ्यांनी लावलेल्या ह्या गीतांच्या चाली गदिमांना इतक्या आवडल्या होत्या की, त्यांनी त्यांची एचएमव्हीकडून एक वेगळी तबकडी बनवून घेतली. या दोन्ही गाण्यांनी खळ्यांना खऱ्या अर्थाने प्रसिद्धी दिली आणि मग खळे एक संगीतकार म्हणून मान्यता पावले.

हिंदी, संस्कृत, गुजराती, बंगाली इत्यादी भाषांमधील गीतांना खळेअण्णांनी जरी स्वरबद्ध केले असले तरी त्यांचे खरे योगदान हे मराठी भावगीत या गीतप्रकारामध्ये आहे. भावगीतांव्यतिरिक्त 'बोलकी बाहुली', जिव्हाळा', 'पोरकी', 'पळसाला पाने तीन' यासारख्या निवडक सहा मराठी चित्रपटांना खळेअण्णांनी संगीत दिले आहे तसेच लता मंगेशकर आणि पं. भीमसेन जोशी ह्या दिग्गजांना घेऊन त्यांनी 'रामश्याम गुणगान' हा गीतसमूह संगीतबद्ध केला होता.

१९६८ सालादरम्यान खळ्यांनी आकाशवाणीतली नोकरी सोडून 'एचएमव्ही' या मातब्बर म्युझिक कंपनीत ध्वनिमुद्रण अधिकारी म्हणून सूत्रे हाती घेतली. त्यांची एचएमव्ही कंपनीतली कारकीर्द त्यांच्या मनाला खूपच समाधान देणारी होती. नवनवे प्रयोग त्यांना इथे करायला मिळाले. श्रीनिवास खळेसाहेबांची सर्वात अप्रतिम गाणी कोणती हे सागरातून मोती शोधण्याएवढं अवघड काम आहे. २ सप्टेंबर २०११ रोजी ते सर्वांना सोडून गेले. **(साभार : इंटरनेट)**

क्लिक...क्लिक...!

मुरूड : गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर महिलावर्ग उकडीच्या मोदकांसाठी तांदूळ वाळवत आहेत. (छाया : सुधीर नाझरे)

आरोग्य प्रहर

तुमच्या डोळ्यांचा रंग आरोग्याबद्दल काय सांगतो?

तुम्ही अनेकदा ऐकलं असेल की, डोळे म्हणजे मनुष्याच्या व्यक्तिमत्त्वाचा आरसा असतो. डोळ्यांखाली काळी वर्तुळे तयार होणं ही मोठी सौंदर्य समस्या आहे. ही वर्तुळं का तयार होतात हे समजून न घेता त्यावर फक्त कॉस्मेटिक उपाय केले जातात, पण त्यामुळे काळ्या वर्तुळांची समस्या सुटत नाही; उलट ती आणखी तीव्र होते. डोळ्यांखाली काळी वर्तुळं निर्माण होण्यास एखादं विशिष्ट कारणच कारणीभूत असतं असं नाही, तर काळ्या वर्तुळांच्या समस्येमागे अनेक कारणं करतात. त्यातील बरीचशी कारणं ही जीवनशैली आणि सवयींशी निगडित असतात. दरम्यान, याची कारणं आणि त्यावर उपचार कसे करावेत याबाबत बोलताना गुजरात, डॉकट्यूबचे सदस्य डॉ. जगदीश सखिया यांनी सविस्तर माहिती दिली आहे.

डॉ. जगदीश सखिया यांच्या म्हणण्यानुसार डोळ्यांचा रंगदेखील बदलतो आणि रंग बदलण्याची विविध कारणं असू शकतात तसेच तुमच्या डोळ्यांचा रंग तुमच्या आरोग्याबद्दल काय सांगतो? हेदेखील जाणून घेऊ.

काहींच्या डोळ्यांचा रंग थोडासा गुलाबी असतो. त्याचं कारण असं की, विषाणूजन्य संसर्ग, ॲलर्जी किंवा चिडचिडेपणामुळे असा रंग होऊ शकतो. त्यावर डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार उपचार घेणं गरजेचं आहे.

हिमोलेक्रिया : हा एक दुर्मिळ आजार असून त्यामध्ये रुग्णाच्या डोळ्यांतून रक्ताचे अश्रू येतात. अश्रूंमधून रक्तस्राव ही एक वैद्यकीय स्थिती आहे, ज्याला हेमोलेक्रिया म्हणतात. ही स्थिती रक्तरंजित अश्रू म्हणून ओळखली जाते. ही एक दुर्मिळ स्थिती आहे. त्यात अश्रूंचा रंग काहीसा लाल असू शकतो किंवा पूर्णपणे रक्तस्राव होऊ शकतो. जर तुम्हाला रक्तरंजित अश्रूंशिवाय इतर कोणतीही लक्षणं, जसे की डोळ्यातील अस्वस्थता किंवा वेदना जाणवत असतील, तर लगेच वैद्यकीय उपचार घ्या.

पिंग्यूकुलाचे सर्वांत सामान्य व महत्त्वाचे लक्षण म्हणजे पांढऱ्या भागावर पिवळा डाग दिसणे. गंभीर प्रकरणांमध्ये तो शस्त्रक्रिया काढून टाकणे आवश्यक असू शकते.

हेटेरोक्रोमिया म्हणजे बुबुळाचा रंग बदलणे किंवा बुबुळाच्या रंगद्रव्यावर परिणाम करणारी परिस्थिती यांसारख्या दुर्मिळ स्थिती उद्भवणे.

म्हणूनच डोळ्यांचा रंग बदलत असेल तर सावधान व्हा आणि आवश्यक ती काळजी घ्या.

रायगडात स्वच्छ माझे अंगण अभियान

यशस्वी कुटुंबांचा होणार ग्रामपंचायतीकडून गौरव

अलिबाग : प्रतिनिधी

नागरिकांना स्वच्छतेच्या बाबींची सवय अंगीकृत करण्याच्या दृष्टीने स्वच्छ माझे अंगण अभियान राबविण्यात येत आहे. १ ते २५ सप्टेंबर या कालावधीत हे अभियान राबविण्यात येणार असून, त्यात स्वच्छतेबाबत कुटुंब स्तरावर सर्व बाबींचे शास्त्रशुद्ध पद्धतीने व्यवस्थापन करणाऱ्या कुटुंबांचा ग्रामपंचायतीकडून गौरव करण्यात येणार आहे.

या अभियानाची जिल्ह्यात प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याचे आवाहन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड व पाणी व स्वच्छता विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी शुभांगी नाखले यांनी केले आहे.

स्वच्छ माझे अंगण १ सप्टेंबरपासून सुरू करण्यात आले आहे. या अभियानाची अंमलबजावणी करताना स्वच्छ भारत मिशन टप्पा२ अंतर्गत वैयक्तिक शौचालय, घनकचरा व्यवस्थापन, सांडपाणी व्यवस्थापन राबवीत असलेल्या राज्यातील सर्व कुटुंबस्तरावर या बाबींची प्रभावीपणे अंमलबजावणी होऊन नित्य-नियमाने स्वच्छतेच्या बाबींची सवय अंगीकृत करण्यासाठी जे कुटुंब वैयक्तिक शौचालय, सांडपाणी व्यवस्थापनकरिता शोषखड्डा, परसबाग, पाझरखड्डा, घनकचरा व्यवस्थापनाकरिता कंपोस्ट खतखड्डा अथवा घरगुती खतखड्डा आणि कुटुंबस्तरावर कचराकुंड्या याबाबतची उपलब्धता करून घेतली असून, त्यांचा नियमितपणे वापर करतात. अशा कुटुंबांना प्रोत्साहन देणे आणि त्यांचे अनुकरण करण्यासाठी इतर ग्रामस्थांना, कुटुंबधारकांना वैयक्तिक स्वच्छतेच्या सुविधा आपल्या घरात किंवा परिसरात उपलब्ध करून घेण्यासाठी उद्युक्त करणे या बाबींवर भर देण्यात येणार आहे.

स्वच्छतेबाबत कुटुंबस्तरावरील प्रत्येक घटकाचे शास्त्रशुद्ध पद्धतीने व्यवस्थापन करण्यासाठी गावातील सर्व कुटुंबामध्ये स्वच्छ माझे अंगण अभियान राबविण्याचे निर्देश देण्यात आले असून, उत्कृष्ट व्यवस्थापन करणाऱ्या कुटुंबांना २ ऑक्टोबरला ग्रामपंचायत ग्रामसभेमध्ये सरपंच व ग्रामसेवक यांच्या संयुक्त स्वाक्षरीने प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात येणार असल्याची माहिती पाणी व स्वच्छता विभागाने यांनी दिली.

खोपोली स्टेशन परिसरातील समस्यांबाबत भाजपचे निवेदन

खोपोली : प्रतिनिधी

मध्य रेल्वेचे शेवटचे स्टेशन खोपोली या ठिकाणी विविध समस्या असून त्या समस्यांबाबत रेल्वे प्रशासनाने तातडीने सुधारणा कराव्या, अशा आशयाचे निवेदन भारतीय जनता पक्ष महिला मोर्चाच्या वतीने खोपोली रेल्वे स्थानकात स्टेशन मास्तर यांना देण्यात आले.

रेल्वे स्टेशन परिसरात पावसामुळे चिखलाचे साम्राज्य असून जागोजागी खड्डे असल्याने त्या ठिकाणी पाणी साचून प्रवाशांना त्यातून मार्ग काढावा लागत आहे. रेल्वेस्टेशन परिसरात नागरी वस्तीतील नागरीक मोठ्या प्रमाणात कचरा टाकत असून त्याबाबतही प्रशासनाने उपाययोजना करावी, असे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

या निवेदनाची तातडीने दखल घेण्यात यावी अन्यथा भाजपतर्फे आंदोलन करावे लागेल, असा इशाराही निवेदनात देण्यात आला आहे. या वेळी महिला आघाडी शहराध्यक्ष अश्विनी अत्रे, भाजप शहराध्यक्ष रमेश रेटरेकर, हेमंत नांदे, सुप्रिया नांदे, सुमिता महर्षी, सूर्यकांत देशमुख, अर्चना साठे, स्नेहल सावंत आदी उपस्थित होते.

रातवड विद्यालयात बालसाहित्य वाचन उपक्रमाची सांगता

माणगाव : प्रतिनिधी

माध्यमिक विद्यामंदिर रातवड विद्यालयात श्रावण महिन्यानिमित्त बालसाहित्य वाचन उपक्रमाचे आयोजन केले होते. दररोज २० मिनिटे बालसाहित्य वाचन करण्यात आले. या उपक्रमाची सांगता शनिवारी (दि.३१) करण्यात आली.

या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांचे वाचन कौशल्य विकसित केले. इ. पाचवी ते दहावीतील उत्तम वाचक असलेल्या विद्यार्थ्यांनी तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनीही या वाचन उपक्रमात सहभागी घेऊन उत्तम प्रकारचे अभिवाचन सादर केले. या उपक्रमासाठी विद्यालयाचे सांस्कृतिक प्रमुख अजित शेडगे व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी नियोजन केले. विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष कदम यांनी मार्गदर्शन केले.

संस्थेचे पदाधिकारी कार्याध्यक्ष श्रीकांत तरटे, उपकार्याध्यक्ष विश्वास सोनवणे, कार्यकारणी सदस्य मिलिंद कुलकर्णी, पाटील यांनी भेट देऊन शुभेच्छा दिल्या.

वरसोली समुद्रकिनाऱ्यावर व्हेल मासा मृतावस्थेत

अलिबाग : प्रतिनिधी

तालुक्यातील वरसोली समुद्रकिनाऱ्यावर व्हेल मासा रविवारी (दि.१) सकाळी मृतावस्थेत आढळून आला. या माशाचे वजन ५०० किलोच्या आसपास असावे, तर लांबी १५ फूट आहे.

याची माहिती मिळताच वनविभाग, पशुसंवर्धन विभाग आणि स्थानिक प्रशासनाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी पंचनामा करून पशुसंवर्धन विभागाच्या मदतीने पुढील सोपस्कार केले.

बोटीच्या धडकेमुळे माशाचा मृत्यू झाला असावा आणि नंतर प्रवाहासोबत तो किनारी वाहून आला असावा, असा अंदाज त्यांनी व्यक्त केला.

ना. रवींद्र चव्हाणांच्या सत्कार सोहळ्याची जय्यत तयारी

पेण : प्रतिनिधी

पेणमध्ये ना. रवींद्र चव्हाण यांचा भव्यदिव्य असा सत्कार सोहोळ्याचे आयोजन सोमवारी (दि.२) करण्यात आले आहे. भाजपचे जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील यांना खासदार बनवण्यासाठी ना. रवींद्र चव्हाण यांचा सिंहाचा वाटा असल्याने पेण विधानसभा मतदारसंघातील कार्यकर्त्यांनी त्यांचा सत्कार सोहळा ठेवला आहे. या सोहळ्याच्या पुर्वतयारीची भाजप जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील यांनी पाहणी केली.

या वेळी जि. प. माजी अध्यक्ष निलिमा पाटील, जिल्हा परिषद माजी सदस्य डी. बी. पाटील, कृषि उत्पन्न बाजार समिती माजी सभापती परशुराम पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य प्रभाकर म्हात्रे, कांदले सरपंच मुरलीधर भोईर, दिव माजी सरपंच विवेक म्हात्रे, उद्योजक प्रशांत पाटील, चंद्रकांत म्हात्रे, कुणाल पाटील उपस्थित होते.

आम्ही ऋणानुमुक्त होणार नाही, पण ज्यांनी आमच्या नेत्याला खासदार करण्यासाठी सिंहाचा वाटा उचलला आहे. त्यांचा सत्कार करणे हे आमचे आद्य कर्तव्य आहे. त्यामुळे आम्ही नामदार मंत्री रवींद्र चव्हाण यांचा पेणमध्ये भव्यदिव्य सत्कार सोहळा ठेवला आहे, असे माजी जि. प. सदस्य डी. बी. पाटील यांनी सांगितले. या सत्कार सोहळ्याला जास्तीत जास्त कार्यकर्त्यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन भाजप दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ यांनी केले आहे.

महाड-पुणे बससेवा भोरमार्गे करण्याची मागणी

महाड : प्रतिनिधी

महाड येथून पुणे येथे जाण्यासाठी वरंध-भोर मार्ग हा जवळचा मार्ग असून अतिवृष्टी व घाटातील रस्ता रुंदीकरण कामामुळे हा घाट वाहतुकीसाठी बंद करण्यात आला होता, मात्र आता या घाटातून वाहतूक सुरू झाली असून महाड-पुणे बस ताम्हिणीमार्गे जातात त्या बस आता भोरमार्गे सुरू कराव्यात, अशी मागणी महाड पत्रकार संघाच्या वतीने शनिवारी (दि.३१) करण्यात आली.

महाड येथून पुणे या ठिकाणी अनेक प्रवासी जात असतात. यामध्ये उच्च शिक्षणासाठी जाणाऱ्या मुलांचे प्रमाण सर्वाधिक आहे. रोज जवळपास २० ते २५ बसेस या मार्गावर वाहतूक करीत असतात. महाडसाठी वरंध भोरमार्गे पुणे हा मार्ग जवळचा असून जवळपास ४० ते ५० किमीच्या अंतराची व वेळेची बचत होते, मात्र अतिवृष्टी व घाटातील रस्ता रुंदीकरण कामामुळे महामार्ग विभागाने या घाटातील वाहतूक बंद केली होती. पर्यायी माणगाव ताम्हिणीमार्गे प्रवास करावा लागत असून अंतर अधिक असल्याने प्रवाशांना तिकीटाचा अधिकचा भुर्दंड सोसावा लागतो, मात्र आता पावसाचे प्रमाण कमी झाले असून, भोरमार्गे वाहतूकदेखील सुरू झाली आहे. याची दखल घेत प्रवाशांच्या सेवेसाठी महाड पत्रकार संघ पुढे आला असुन महाड आगार व्यवस्थापक व महामार्ग विभागाला संघाकडून या बाबतीत निवेदन देण्यात आले आहे.

दरम्यान गणेशात्सवाच्या पार्श्वभूमिवर लवकरच भोरमार्गे बस वाहतूक सुरू केली जाईल, असे आगार व्यवस्थापक फुलपगारे यांनी सांगितले. या वेळी महाड पत्रकार संघाचे अध्यक्ष निलेश पवार, उपाध्यक्ष महेश शिंदे, ज्येष्ठ पत्रकार चंद्रकांत कोकणे, उदय सावंत, राजेंद्र जैतपाळ, निलेश लोखंडे, नितेश लोखंडे पत्रकार सदस्य उपस्थित होते.

नेरळमध्ये शाडूमातीपासून गणपती बनविण्याची ५० वर्षांची परंपरा

कर्जत : प्रतिनिधी

नेरळ येथील वृत्तपत्र विक्रेते असलेले बल्लाळ जोशी यांनी वयाच्या आठव्या वर्षांपासून स्वतःच्या हाताने पर्यावरण पूरक शाडूच्या मातीपासून गणेशमूर्ती घडविण्याची परंपरा आजही कायम ठेवली आहे. जोशी गेली ५० वर्षे गणेशाप्रती असलेली ही सेवा अविरत करीत असून आपला आगळा-वेगळा छंद जपत आहेत आणि तेसुद्धा ६५ व्या वर्षी.

बल्लाळ जोशी वृत्तपत्र विक्रेते आहेत. आपल्या व्यवसायाला साजेसे असे काम करताना बाप्पाची मूर्ती घडविताना त्यांनी एकदा कागदाच्या लगाता वापरून बाप्पाची मूर्ती साकारली होती. आपले हे सर्व छंद जोपासत गणेशोत्सवासाठी जोशी हे आपल्या घरचा बाप्पा स्वतःच घडवतात.

गणेशोत्सवासाठी शाडूच्या मातीपासून बाप्पाची मूर्ती स्वतः बनवण्यास त्यांनी वयाच्या आठव्या वर्षापासून सुरुवात केली.

साधारण १५ इंच उंचीची सिंहासनाधीष्ट असा बाप्पा आपल्या व्यवसायातून वेळ काढून बनवतात. पाच वर्षांपूर्वी त्यांनी कागदाच्या लगातापासून बाप्पाची इकोफ्रेंडली मूर्ती साकारली होती. वृत्तपत्र विक्रेते म्हणून आपल्या व्यवसायात आढळ स्थान कायम ठेवणारे जोशी यांचा हा आगळा वेगळा छंद पर्यावरण रक्षणासाठी निश्चितच महत्त्वाचा मानला जात आहे.

श्रावण महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासून ते आपल्या घरचा गणपती साकारायला सुरुवात करतात. सर्वप्रथम खांद्यावर शेला, पितांबर, इवल्याशा हातात वाळा, अंगावर आभूषणे असा साधारण बाप्पा साकारतात तर दुसरीकडे बैठकही कोरीव काम करून साकारली जाते.

सुंदर कोरीव काम केलेले लोड तक्के यांनी बैठक सजवली जाते मग इवलेसे उंदीर मामा वाहन म्हणून स्थानपन्न होतात सर्वात शेवटी मुकुटमणी साकारायचे काम सुरू होते मूर्तीला साजेसे अशी सजावट हिरे माणिक मोती यांनी केली जाते एका हाताने भक्तांना वरदान देत असलेला आणि दुसऱ्या हाताने मोदक घेणारा असा बाप्पा जोशी बनवतात.

मूर्तीचे अतिशय काळजीने केलेले रेखीव रेखीव काम डोळ्यांचे पारणे फेडते. नंतर जोशी हे आपल्या बाप्पाला कुंभारवाड्यात नेऊन रंगकाम करून घेतात. कोविड काळात त्यांनी कल्याण येथील गुरुकृपा महाविद्यालयातील विद्यार्थांसाठी सतत दोन वर्षे कार्यशाळेतून शाडूच्या मातीची गणेशमूर्ती साकारण्याचे धडे दिले होते. त्या वेळी येथील विद्यार्थ्यांनी आपल्या हातून छान गणेशमूर्ती साकरल्याचे जोशी यांनी सांगितले.

पीओपीपेक्षा शाडूच्या मातीची मूर्ती ही पर्यावरणपूरक असून मूर्ती विसर्जन केल्यावर पूर्णपणे पाण्यात विरघळून जाते, तसेच पाणीही दूषित होत नाही. त्यामुळे पर्यावरणपूरक अशा मूर्ती आणि सजावट साकार करून गणेश उत्सव साजरा करावा.

-बल्लाळ जोशी, नेरळ

सिडको
शहरांचे शिल्पकार

जाहीर सूचना

(वाटपपत्र/करारनामा करणेबाबत)

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून,खालील तपशीलानुसार संबंधिताना भूखंडाचे करारनामा / वाटपपत्र प्रस्तावित आहे.

अ. क्र.	नोड व संचिका क्र.	गाव व निवाडा क्र.	सर्व्हे/ हिस्सा क्र.	संपादित क्षेत्र (हे.आर.)	मंजूर पात्रत	करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती	करारनामा संबंधित भूधारक व त्यांच्या कायदेशीर वारसांची माहिती	संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्यस्थितीनुसार संपादित जमिनीशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती
ता.पनवेल, जि.रायगड								
१	७६६ तळोजा	पेंधर २८४बी	१४०/३	०-५६-२	४९१.७५ पूर्णांकात ५०० चौ.मी. पात्रता मंजूर असून, सदर मंजूर करण्यात आलेल्या पात्रतेन्वये इरादित व समंत सिमांकित करण्यात आलेला आहे.	भूखंड क्र.-१२, सेक्टर-२०, क्षेत्र - ४९९.८० चौ.मी., नोड-तळोजा-२ हा भूखंड वाटपाकरिता प्रस्तावित आहे.	निवाडा व कबजे पावती नुसार नमूद प्रमाणे एकमेव मूळ भूधारक: **१) कुंडलिक सखाराम भोईर उर्फ पुंडलिक सखाराम भोईर** यांच्या नावे नोड-तळोजा येथे, भूखंड क्र.-१२, सेक्टर-२०, क्षेत्र ४९९.८० चौ.मी., नोड-तळोजा-२ या भूखंड वाटपाची पूढील कार्यवाही करण्यात येत आहे.	विधी सहा. यांनी संचिकेत सादर केलेल्या अभिप्रायानुसार संचिकेतील उपलब्ध कागदपत्र सिडको LTS प्रणालीचे अवलोकन केले असता प्रस्तावित भूखंड क्रं.- १२, सेक्टर-२०, क्षेत्र-५०० चौ.मी., तळोजा भूखंडाचे अनुषंगाने प्रलंबित न्यायालयीन दावा, हरकत, मनाई हुकूम, कोर्ट कमिशनर नेमणूक असल्याचे दिसून येत नाही, असे अभिप्राय नमूद केलेले आहेत.
२	उलवे १८२	वहाळ २३१	२५३/१ब	०-१७-०	१५० चौ.मी.	उलवे नोड येथील भूखंड क्र.-३९९, सेक्टर-१९, क्षेत्र -१५० चौ.मी.	**मूळ भूधारक** कै. पंढरीनाथ महादू गोंधळी(मयत) व कै. बाळकृष्ण पंढरीनाथ गोंधळी (मयत) यांचे हक्कसोडपत्रान्वये लाभार्थी वारस **१) श्री. संतोष बाळकृष्ण गोंधळी** **२) श्री. दर्शन बाळकृष्ण गोंधळी**	सदर भूखंड वाटपास पात्र असलेल्या लाभार्थी भूधारक १) श्रीमती छाया हरी टकले उर्फ छाया बाळकृष्ण गोंधळी, २) श्रीमती निशा राजू अजगोलकर उर्फ निशा बाळकृष्ण गोंधळी, ३) श्रीमती शिल्पा श्रीकांत ढवळे उर्फ शिल्पा बाळकृष्ण गोंधळी व ४) श्रीमती आरती अजित ठाकूर व ५) श्री. अमर धर्मा पाटील यांनी सह-दुय्यम निबंधक, पनवेल-२ यांच्याकडे दस्तऐवजाचा अनुक्रमांक पवल-२-७६१३/२०२४ अन्वये दि. १५/०४/२०२४ रोजी हक्कसोड पत्र नोंदणीकृत करून प्रस्तावित उलवे नोड येथील भूखंड क्र.३९९, सेक्टर-१९, क्षेत्र-१५० चौ.मी. या भूखंडाचे लाभ **१. श्री. संतोष बाळकृष्ण गोंधळी व २. श्री. दर्शन बाळकृष्ण गोंधळी** यांच्या लाभात हस्तांतरीत केले आहेत.
३	दापोली ८४	दापोली १५०	५१/१+ ६अ ४४/३ ६९/४ब १२०/३ एकूण	०-३५-२ ०-१२-७ ०-२३-८ ०-२६-० ०-४४-९	८५० चौ.मी. प्रस्तावित	उलवे नोड येथील भूखंड क्र.A-५, सेक्टर-१५, क्षेत्र-८४९.८५ चौ.मी	**१) श्री. एकनाथ नागा कटेकर** **२) श्री. धोंडू नामा कटेकर**	-

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकाच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसाच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकूरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रांसह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करुन वाटपपत्र करुन देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यात येणार असून अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जांची दखल घेतली जाणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
१२.५ टक्के योजना, सिडको भवन, तळ मजला,
सी.बी.डी., बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

अति.मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (पनवेल)

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/२०१/२०२४-२५

पडीक वाहनांचा कायदेशीर बंदोबस्त

तब्बल ७७ वाहने मूळ मालकांकडे सुपूर्द

पनवेल : वार्ताहर

पोलीस ठाण्याच्या आवारात बऱ्याच कालावधीपासून धुळखात पडलेल्या बेवारस मालमत्तेतील एकुण ७७ वाहनांच्या मुळ मालकाचा शोध शिळ – डायघर पोलीस ठाणे, ठाणे शहर आणि गंगामाता वाहन शोध संस्थेने लावला आहे. त्यापैकी ७७ दुचाकी, सहा चारचाकी आणि रिक्षा अशा एकूण ७७ वाहनांचा समावेश आहे. ही वाहने धुळखात पडल्यामुळे आरोग्याचा धोका निर्माण होतो. बेवारस वाहने ज्यांची आहेत त्यांनी योग्य कागदपत्रे दाखवून ती सात दिवसाच्या आत घेउन जावीत, अन्यथा पोलिसांकडुन त्या वाहनाची कायदेशीर प्रक्रीया पूर्ण करण्यात येईल, असे आवाहन शिळ – डायघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरिक्षक संदिपान शिंदे यांनी केले आहे.

विविध गुन्ह्यांमध्ये अशी वाहने पोलीस ठाण्यात जमा केली जातात, मात्र न्यायालयीन प्रक्रीयेमुळे तसेच बेवारस वाहनाचे मालक मिळुन येत नसल्याने ही वाहने पोलीस ठाण्याच्या आवारात मालकाच्या प्रतिक्षेत पडून राहतात. या पार्श्वभूमीवर ठाणे शहर पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांनी बेवारस वाहनांच्या मालकाचा शोध घेउन ती वाहने ताब्यात देण्याचे आदेश प्रभारी अधिकाऱ्यांना दिले होते. त्यानुसार पोलीस सहआयुक्त चव्हाण, अप्पर आयुक्त देशमुख, परिमंडळ १ उपायुक्त बुरसे, कळवा विभागाचे सहायक आयुक्त कोळेकर, शिळ डायघरचे वरिष्ठ निरिक्षक संदिपान शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार पोलिसांनी बेवारस वाहन मालकांचा शोध घेणे सुरू केले. त्यासाठी पोलिसांनी परंदवाडी, तळेगाव दाभाडे, ता. मावळ जि. पुणे येथील महाराष्ट्रात अग्रेसर असलेल्या गंगामाता वाहन शोध संस्थेची मदत घेतली.

या संस्थेचे अध्यक्ष राम उदावंत यांनी शिळ–डायघर पोलीस ठाण्यात येउन बेवारस वाहनांची पाहणी केली. श्री. उदावंत व पोलिसांनी या वाहनांचे चेसीस नं. व इंजिन क्रमांकावरून दोनच दिवसांत ७७ वाहनांच्या मुळ मालकाचा शोध लावला. त्यासाठी गुन्हे शाखेच्या पोलीस पथकासह गंगामाता वाहन शोध संस्थेचे अध्यक्ष राम उदावंत, उपाध्यक्ष बाबासाहेब बागडे, भारत वाघ यांनी परिश्रम घेतले. ज्यांची वाहने असतील त्यांनी पुरावा देउन ती घेऊन जावीत अन्यथा त्यांचा लिलाव करून आलेली रक्कम सरकारी तिजोरीत भरली जाईल असे आवाहन वरिष्ठ निरिक्षक संदिपान शिंदे यांनी केले आहे. वाहनाचे चेसीस व इंजिन नंबर यांची यादी करून बेवारस, अपघात व गुन्ह्यातील वाहने अशी वर्गवारी करून मुळमालकाचा पत्ता शोधला जातो. अनेकदा वाहनमालकाचा जुना पत्ता रजिस्टर नोंद असल्याने मालक त्या पत्यावर मिळुन येत नाही. त्यावेळी वाहनाची बारकाइने माहिती गोळा करून मुळ मालकापर्यंत पोहचण्याचा प्रयत्न केला जातो, असे संस्थेचे अध्यक्ष राम उदावंत यांनी सांगितले.

निवडक

रुग्णाचा मृत्यू; नातेवाईकांचा शोध

पनवेल : येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आलेला एक रुग्ण उपचारादरम्यान लघवी करण्याकरिता बाथरुममध्ये गेला असता निपचित पडलेल्या अवस्थेत आढळला असून, त्याच्या नातेवाईकांचा शोध शहर पोलीस करीत आहेत. या व्यक्तीचे नाव अजय सिंग असे असून अंदाजे वय ४५, रंग सावळा, दाढी मिशीचे केस काळे वाढलेले, उंची पाच फूट पाच इंच, डोक्याला अर्धवट टक्कल, अंगात सफेद लाल रंगाचा फुल बाह्याचा शर्ट घातलेला आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी शहर पोलीस ठाणे दुरध्वनी (२७४५२४४४) किंवा सहा. पोलीस निरीक्षक राजरत्न खैरणार यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

माझा बाप्पा माझ्या घरी उपक्रम

नवी मुंबई : नूतन विद्यालयात २५ ते ३० ऑगस्ट या कालावधीमध्ये शाडूच्या मातीचे गणपती बाप्पा बनविण्याची कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यशाळेत १५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी सुबक बापाचे आकार तयार करून रंगकाम केले. या कार्यशाळेला मार्गदर्शन कलाशिक्षक श्रीहरी पवळे यांनी केले.

सोनारी गावात दहीहंडी उत्साहात

उरण : युवा संघटना सोनारी व गारवाली देवी बिट्स तसेच सामाजिक कार्यकर्ते राकेश कडू यांच्या माध्यमातून दहीहंडी २०२४ उत्सव सोनारी गावात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या वेळी जिल्हा परिषद शाळेसमोरील मैदानात दहीहंडी उत्सव साजरा करण्यात आला. या वेळी न्हावा शेवा वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजुंमन बागवान व मुजावर (वरिष्ठ पोलीस निरीक्षक ट्रफिक न्हावा शेवा) यांनी आवर्जून उपस्थिती दाखविली. तसेच सोनारी गावातील ज्येष्ठ नागरीक, तरूण मंडळी, राजकारणातली मान्यवर मंडळी यांनी दहीहंडी उत्सवाबद्दल आयोजकांच्या नियोजनाचे कौतुक केले. सुनंदा साऊंड सर्विस व युवा संघटना आणि गारवाली बिट्स सोनारी, स्टेप आर्ट अकॅडमी यांचे आणी अनघा (मालिका कलाकार) यांनी स्टेज शेअर करून गावातील लोकांना मनमुराद आनंद दिला. दहीहंडी श्री सिद्धिविनायक गोविंदा पथक सोनारी यांनी फोडली.

पारंपरिक मंगळागौर उत्साहात

उरण : तालुक्यातील द्रोणागिरी नोड येथील प्रजापती म्यॅगनम वसाहतमध्ये मंगळागौर सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. मंगळागौर सणामुळे मैत्रीचे स्नेहधागे बांधून एक संस्कृतीचा वसा पुढच्या पिढीला साकार केला गेला. या वेळी या कार्यक्रमाला महिलांचा उस्फुर्त प्रतिसाद पाहायला मिळाला. सहभोजनाचा आस्वाद घेत मंगळागौर कार्यक्रमाच्या रूपरेषेची सांगता झाली.अशा प्रकारे प्रजापती म्यॅगनम महिला समूह आयोजित मंगळागौर सण मोठया उत्साहात साजरा करण्यात आला.

अत्याचार रोखण्यासाठी शाळांमध्ये व्याखान

पनवेल : वार्ताहर

खारघर पोलिसांकडून खारघरमधील हार्मोनी स्कूल आणि सेक्टर–१०मधील सुधागड शाळेत जनजागृतीपर व्याख्यान देण्यात आले. या वेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक पांडुरंग घागरे, महिला पोलीस कर्मचारी शितल वुंठे, दिपीका चव्हाण, आदिंनी मार्गदर्शन केले.

लैंगिक अत्याचाराच्या घटना घडल्याचे निदर्शनास येत आहे. अशा प्रकारच्या घटना घडू नये याकरिता आपली सर्वांची जबाबदारी आहे. असे काही प्रकार निदर्शनास पोलीस मदतीसाठी ११२ आणि सायबर फ्रॉडसाठी १९३० क्रमांकाची हेल्पलाईन उपलब्ध आहे.

नागरिकांनी या हेल्पलाईनविषयी माहिती माहिती देऊन त्याचा प्रसार नागरिकांमध्ये करावा तसेच पोलीस प्रशासनाने सुरू केलेल्या व्हॉटसॲप चॅनलला शाळेतील शिक्षकांमार्फत सर्व विद्यार्थ्यांच्या फॉलो करा, अशा प्रकारचे जनजागृती अभियान खारघर पोलिसांकडून सुरू करण्यात आले आहे.

बदलापूर तसेच इतर काही ठिकाणी लैंगिक अत्याचाराचे प्रकार उघडकीस आल्यामुळे शाळा प्रशासन, शिक्षक, विद्यार्थी आणि पालकांमध्ये जनजागृती खारघर पोलिसांकडून शाळांमध्ये जनजागृती अभियान व्हावी यासाठी खारघर पोलिसांच्या वतीने परिसरातील शाळेत सायबर सुरक्षा–गुन्हे प्रतिबंध, व्यसनमुक्ती आणि अंमली पदार्थ प्रतिबंध, आर्थिक फसवणूक आणि प्रतिबंधक उपाय, जेष्ठ नागरिक सुरक्षा– काळजी, मुली, महिला–बालकांची सुरक्षा आदि विषयावर माहितीपर जनजागृती अभियान सुरु करण्यात आले आहे.

शाळेतील विद्यार्थी यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने शाळा परिसरात सीसीटीव्ही अद्ययावत असावे. तसेच काही प्रकार घडल्यास तात्काळ पोलीस ठाण्यात संपर्क साधावा, अशा प्रकारच्या सूचना शाळा प्रशासनाला दिल्या जात असून सर्व शाळांमध्ये सदर उपक्रम राबविण्याचा संकल्प आहे.
–वैशाली गलांडे,
वरिष्ठ पोलीस निरीक्षक, खारघर

उरण : अखिल आगरी समाज परिषदेतर्फे रविवारी जासई येथील दिवंगत लोकनेते दि.बा. पाटील सभागृहात भव्य आगरी समाज मेळावा आयोजित करण्यात आला होता. हा मेळाव्यात प्रकाश शांताराम ठाकूर यांना महाराष्ट्र शासनातर्फे वसंतराव नाईक कृषीभूषण पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार गणेश नाईक, आमदार प्रशांत ठाकूर यांनी प्रकाश ठाकूर यांचा गौरव केला.

शांतिवन आदिवासी आश्रमशाळेला टीव्ही आणि इन्व्हर्टर संच भेट

पनवेल : रामप्रहर वृत्त

कुष्ठरोग निवारण समिती संचालित अण्णासाहेब सहस्त्रबुध्दे आदिवासी शाळेसाठी इनरव्हील क्लब ऑफ मुंबई खार या संस्थेमार्फत शाळेच्या गरजेनुसार टि.व्ही. संच आणि इन्व्हर्टर देण्यात आला.

या वेळी इनरव्हील क्लब ऑफ मुंबई खारच्या क्लब सेक्रेटरी देविका रहेजा, भुतपुर्व अध्यक्षा यशी चौव्हान, इनरव्हील डि. ३१४च्या भुतपुर्व अध्यक्षा तसेच मणीभवन गांधी संग्रहालयच्या विश्वस्त फाल्गुनी मेहता, कुष्ठरोग निवारण समितीचे प्रमुख कार्यवाह विनायक शिंदे आणि इनरव्हील क्लब ऑफ मुंबई खारच्या मेंबर्स शाळेतील शिक्षकवृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते.

मुलांनी पाहुण्यांचे स्वागत लेझीम व मानवी मनोरे यांनी केले पाहुण्यांना मानवी मनोऱ्याचे फार कौतुक वाटले. कार्यक्रम ठिकाणी सर्वांसाठी शाळेतील मुलांनी एक साथ विशिष्ठ प्रकारच्या टाळ्याने स्वागत केले. नंतर आश्रमशाळेतील मुलांनी महात्मा गांधी यांच्या जीवनावर सुंदर नृत्य केले. या वेळी सर्व पाहुणे आनंदित झाले. आश्रमशाळेतर्फे पाहुण्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. इनरव्हील क्लब ऑफ मुंबई खार ने टि.व्ही. संच व इनव्हर्टर शाळेतील शिक्षक मुलांना दिला. या कार्यक्रमात इनरव्हील क्लब ऑफ मुंबई खार यांनी सर्व शिक्षक, कर्मचारी यांना त्यांचा सन्मान करून त्यांना भेटरूपात प्रत्येकाला स्टीलची पाणी बॉटल दिली.

महिलांना कापडी पिशव्यांचे वाटप

नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी

आमदार मंदा म्हात्रे यांनी नवी मुंबई प्लास्टीक मुक्त करण्यासाठी घेतला पुढाकार याच अनुषंगाने आमदार मंदा म्हात्रे यांनी जुईनगर–सानपाडा विभागातील महिलांना डॉ. राजेश पाटील व काशिनाथ पाटील यांच्या उपस्थितीत कापडी पिशव्यांचे वाटप केले.

नवी मुंबई प्लास्टीक मुक्त करण्यासाठी या वेळी त्यांनी प्रभावी जनजागृती केली तसेच आमदार म्हात्रेंतर्फे नवी मुंबईतील मागणी करणाऱ्या सर्व गणेश मंडळांना सुंदर आणि टिकाऊ कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात येणार असल्याचे आमदार म्हात्रे यांनी स्पष्ट केले. त्या पुढे म्हणाल्या जेव्हा जेव्हा नं.मु.म.पा. तर्फे पावसाळी पुर्वी किंवा नंतर गटार नाले साफ केले जातात त्यात सर्वाधिक प्रमाणात प्लास्टीक पिशव्या व प्लास्टीकच्या वस्तुच आढळतात. त्यामुळे नवी मुंबईकरांनी आता प्लास्टीकच्या पिशव्या वापरणे बंद करावे, असे आवाहन केले आहे.

आमदार मंदा म्हात्रे यांनी नवी मुंबईतील सर्व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना ही नवी मुंबई प्लास्टीक मुक्त अभियानाअंतर्गत आपल्या गणेश मंडपाशेजारी प्लास्टीक मुक्तीचे प्रबोधनात्मक बॅनर व देखावे उभारावे आणि या चळवळीत सहभागी होण्यासाठी कळकळीची विनंती ही केली आहे.

प्लास्टिकमुक्त सोसायटींसाठी रहिवाशांमध्ये जागृती

नवी मुंबई : बातमीदार

स्वच्छतेप्रमाणेच पर्यावरणाला व मानवी जीवनाला घातक असणाऱ्या प्लास्टिकपासून सर्वांना वाचविण्यासाठी प्लास्टिकचा वापर टाळण्याबाबत नवी मुंबई महापालिकेच्या माध्यमातून व्यापक जनजागृती करण्यात येत असून महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली प्लास्टिकमुक्त सोसायटी अभियान राबविले जात आहे.

या अंतर्गत बेलापूर विभागाचे सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी शशिकांत तांडेल यांच्या पुढाकारातून स्वच्छता अधिकारी सूर्यकांत म्हात्रे यांच्या सहयोगाने सेक्टर ३८ नेरूळ येथील केंद्रीय विहार सोसायटी, सेक्टर ४४ नेरूळ येथील गिरीराज सोसायटी व सेक्टर ११ सीबीडी बेलापूर येथील मरमेंट सोसायटी याठिकाणी स्वच्छतेसोबतच प्लास्टिकमुक्त सोसायटी विषयी जनजागृती करण्यात आली व तेथील रहिवाश्यांना प्रोत्साहित करण्यात आले.

येथे कचरा वर्गीकरण, कचरा प्रक्रिया प्रकल्प, थ्री आर चे महत्व, प्लास्टिकचे दुष्परिणाम याविषयी माहिती देऊन जागरूकता निर्माण करण्यात आली तसेच सूर्योदय बँकेच्या सीएसआर सहकार्यातून कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी मी प्लास्टिक पिशव्या व एकल वापराच्या प्लास्टिकचा वापर करणार नाही, अशी सामुहिक शपथही ग्रहण करण्यात आली.

यावर्षीचा गणेशोत्सव प्लास्टिकमुक्त साजरा करणेविषयी आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी यापूर्वीच आवाहन केले असून याबाबतही नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली.

मंगळसूत्र खेचले

पनवेल : ६४ वर्षीय महिलेचे मंगळसूत्र खेचून ते पळून गेले. याप्रकरणी दोघांविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

कलाबाई देवराम पाटील ह्या खारघर सेक्टर १२ येथे राहत असून शनिवारी देवाळेश्वर मंदिरात सकाळी दर्शनासाठी जात होते. या वेळी मंदिराच्या गेट समोर असताना पाठीमागून मोटरसायकल वरून दोघे आले व सोन्याचे मंगळसूत्र खेचले. त्यांनी मोटरसायकलवर पाठीमागे बसलेले व्यक्तीची कॉलर धरून खाली पाडण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी त्या मोटरसायकल वरील चोरांनी या महिलेला वीस फूट फरफटत नेले. यात त्या जखमी झाल्या आहेत. त्या ओरडल्या असत्या दोघेही मोटरसायकल वरून पळून गेले.

या वेळी मंगळसूत्राचा अर्धा भाग त्यांच्या गळ्यात तसाच होता. नऊ ग्रॅम वजनाचे मंगळसूत्र खेचून नेल्याप्रकरणी चोराविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

विद्यार्थी वाहक संस्थेतर्फे वाहतुकीची कार्यशाळा

पनवेल : वार्ताहर

हजारो विद्यार्थ्यांना स्कूल व्हॅनमधून शाळेत ने आन केली जाते. रस्त्यावरील सुरक्षितता ही व्हॅन चालकांवर पूर्णपणे अवलंबून असते. या संदर्भात दरवर्षीप्रमाणे यंदाही पनवेल विद्यार्थी वाहक संस्थेच्या वतीने कार्यशाळा आणि मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्याचबरोबर विद्यार्थ्यांचा गुणगौरव गरीब गरजूंना वह्या वाटप तसेच रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. पनवेल येथील कोकण एज्युकेशन सोसायटीच्या संकुलात हा उपक्रम झाला.

या वेळी मोटार वाहन निरीक्षक संदीप कित्ते, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक विजया घामे, पनवेल शहर वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक जी आर शेरखाने, सामाजिक कार्यकर्ते हरीश बेकावडे, स्वराज्य संघटनेचे उपाध्यक्ष विनोद साबळे, वनवासी कल्याण आश्रमाचे केंद्रप्रमुख संदीप शिंदे, कमला अर्णव चॅरिटेबल फाउंडेशनचे कमल काटकर, पालक प्रतिनिधी ऍड संदीप वाघ, योगेश लांगे, परिवर्तन विद्यार्थी वाहक संस्थेचे संतोष गोळे, बाळासाहेब जगताप, शशिकांत देशमुख, अनंत सत्वे, शौकत चाफेकर, दिनकर मोरे, राजेश बागडे उपस्थित होते.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यार्थी वाहक संस्था पनवेलचे अध्यक्ष पांडुरंग हुमणे यांच्या अध्यक्षतेखाली उपाध्यक्ष ज्योतिबा रायकर, सचिव बन्सीलाल तळेकर, खजिनदार किसन रौंधळ, कार्याध्यक्ष राजेश भगत आणि सर्व संचालक आणि सभासदांनी विशेष परिश्रम घेतले. वनवासी कल्याण आश्रम आणि कमल अर्णव चॅरिटेबल फाउंडेशनचा या वेळी विशेष सन्मान करण्यात आला.



श्रावण सरी

दिवसाची सांज होई अंधारून आले
मेघ झाले रिते बरसत्या सरींचे गाणे
काळ्या मेघांचे छत धुके दिशांत लपेटले
निसर्गाची लागे संतत धून पावसाचे देणे

ओले पक्षी पंख मिटून चिंब कोटरात
भाग्य सुगीचे स्वप्न हळू चिवचिव कूजनात
धारा पागोळ्यांचे ओहोळ रस्ते सारे पाण्यात
वारा शांत थंडावा देई अमृत वर्षा चराचरात

श्रावणसरी रंग चढविती हिरव्या यौवनात
रंग केशरी पानगळ वाहे दूर जाई जळात
ऊन पाऊस बरसे सप्तरंगी इंद्रधनू गगनात
वसुंधरेचे सृजन गान अंकुरे रानावनात

–सुजाता खरे,
नवीन पनवेल

कर्जत-वंजारवाडी रस्ता खड्डेमय

अपघाताला निमंत्रण; तातडीने दुरूस्ती करण्याची मागणी

कर्जत : प्रतिनिधी

कर्जत तालुक्यातील वंजारवाडी फाट्यावर असलेल्या रस्त्यांची खूप दयनीय अवस्था झाली असून रस्त्यात मोठमोठे खड्डे पडले आहेत. रात्रीच्या वेळी या रस्त्याने प्रवास करताना चालकांना तारेवरची कसरत करावी लागते. या खड्ड्यांमुळे अपघाताला निमंत्रण मिळात आहे. त्यामुळे गणेशोत्सवाच्या आधी या रस्त्याची दुरूस्ती करण्याची मागणी प्रवाशांमधून होत आहे.

तालुक्यातील शहापूर-मुरबाड-कर्जत-खोपोली ५४८ अ राष्ट्रीय महामार्ग असून या महामार्गावरून मोठ्या प्रमाणात वाहतूक सुरू असते. राष्ट्रीय महामार्गावर अशाप्रकारे खड्डे पडूनदेखील संबंधित विभाग याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे चित्र आहे.

पेज नदी पूल सोडल्यानंतर कर्जतच्या दिशेने येताना हे भयानक खड्डे अपघाताला निमंत्रण देत आहेत. जवळजवळ ३-४ फूट लांब आणि एक फूट खोल तसेच आजूबाजूला अनेक खड्डे पडल्याने रस्त्यात खड्डे की, खड्ड्यात रस्ते असे चित्र पहायला मिळत आहे. पावसाळा असल्याने हे खड्डे पूर्ण पाण्याने भरल्यावर खड्डा किती मोठा आहे याचा अंदाज वाहनचालकाला येत नाही. त्यामुळे या रस्त्यावर येणारे वाहन खड्ड्यात आदळून वाहनांचे नुकसान होत आहे.

काही महिन्यांपूर्वी याच ठिकाणी महम्मद हरून यांचा अपघात झाला. चार दिवस कोमात असताना त्यांचा मृत्यू झाला होता, तर याच ठिकाणी कशेळे येथील शिक्षिकेचाही अपघात होऊन हात फ्रॅक्चर झाला होता. त्यामुळे जीवघेणे खड्डे त्वरित भरून पुढे होणारे अपघात टाळता येतील. संबंधित विभागाने या रस्त्याची त्वरित पाहणी करून खड्डेमय झालेले रस्ते भरून डागडुजी करावी आणि वाहनचालकांचा प्रवास सुखकर करावा, अशी मागणी होत आहे.

गेल्या अनेक महिन्यांपासून या महामार्गावर खड्डे पडले आहेत. या खड्डेमय रस्त्यावर अनेकांना आपला जीव गमवावा लागला आहे. काहींचे हात पाय फ्रॅक्चर होऊन दुखापत ही झाली आहे. तरी निद्रावस्थेत असलेलं प्रशासनाने महामार्गाची त्वरित डागडुजी कारवाई आणि अपघाताला निमंत्रण देणारे खड्डे तत्काळ भरावेत.

-राजेश लाड,
माजी नगराध्यक्ष, कर्जत

निवडक

विद्यार्थ्यांना शैक्षणिक वस्तूंचे वाटप

मोहोपाडा : खालापूर येथील जि. प. शाळेतील विद्यार्थ्यांना विश्वनिकेतन अभियांत्रिकी महाविद्यालयातील स्टुडंट असोसिएशन ऑफ आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग आणि सनाया फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शालोपयोगी साहित्याचे वाटप करण्यात आले. यात विद्यार्थ्यांना वह्या, चित्रकला वह्या, कलर्स, पेन, स्कूल बॅग व खाऊवाटप करण्यात आले. या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी आर.पाटील, उपप्राचार्य डॉ. एस. बी. कदम, कॉम्प्युटर सायन्स अँड इंजीनियरिंग विभाग प्रमुख डॉ. अंकुश पवार, प्रा. अश्विनी गारोळे, घनश्याम वीर, स्टुडंट असोसिएशनचे प्रेसिडेंट श्रेयश खेंगरे, विद्यार्थी उपस्थित होते.

रिक्षाचालकाचा प्रामाणिकपणा

चौक : खोपोली येथील रिक्षाचालक जगदीश मारुती खोपडे यांना त्यांच्या रिक्षात सुमारे २० हजार रु.किमतीचा मोबाईल सापडला. तो त्यांनी खोपोली पोलीस ठाण्यात जमा करून मूळ मालकाला परत केल्याने त्यांच्या प्रामाणिकपणाबद्दल कौतुक होत आहे. आकाश पवार हे जगदीश खोपडे यांच्या रिक्षातून उतरताना ते त्यांचा मोबाईल विसरले. त्या मोबाईलवर फोन आल्याने जगदीश खोपडे यांच्या लक्षात आले. लागलीच त्यांनी खोपोली पोलीस ठाण्यात जाऊन जमा केला. आलेल्या नंबरवर फोन केला असता, आकाश पवार यांच्याशी संवाद साधला, ते लागलीच खोपोली पोलीस ठाण्यात हजर झाले.

मनोज पुलेकर यांना पदोन्नती

मुरूड : नगर परिषदेचे लिपिक मनोज पुलेकर यांना आरोग्य निरीक्षकपदी पदोन्नती मिळाल्यानंतर कामगार संघटनेच्या वतीने गौरविण्यात आले. या वेळी प्रशासकीय अधिकारी परेश कुंभार, नंदकुमार आंबेतकर, आरोग्य निरीक्षक राकेश पाटील, लेखापाल कपिल वेहेले, गजानन भुसाने, संदीप कमाने, स्वप्नील भावसार, जय भिसे, प्रज्वल गुरव, राजु पाटील, अनिकेत भोसले, प्रशांत दिवेकर, नरेंद्र नांदगांवकर, सुदेश माळी, ललीत जैन आदी उपस्थित होते. मनोज पुलेकर यांनी सर्व सहकाऱ्यांचे आभार व्यक्त केले.

कापडेमध्ये भातपिकावर कीडरोगाचा प्रादूर्भाव

शास्त्रज्ञांकडून पाहणी; शेतकऱ्यांना मार्गदर्शन

पोलादपूर : प्रतिनिधी

हवामानातील बदलामुळे कापडे परिसरामध्ये भातपिकावर कीडरोगाचा प्रादूर्भाव दिसून येत आहे. त्यादृष्टीने क्रॉपसॅप अंतर्गत किनेश्वर व कापडे बुद्रुक येथे गाव बैठक व क्षेत्रीय भेटीचे आयोजन करण्यात आले.

सध्या कापडे परिसरामध्ये निळे भुंगेरे या किडीचा प्रादूर्भाव आढळून येत आहे. त्या अनुषंगाने रोहा कृषी विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ जीवन आरेकर यांनी शेतकऱ्यांना भातपिकावरील विविध कीडरोगांची ओळख व व्यवस्थापन याविषयी मार्गदर्शन केले. कृषि पर्यवेक्षक रवींद्र गुंड व कृषी सहाय्यक मोनिका पिसाळ उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन कृषि सहाय्यक कोमल कचरे यांनी केले.

सध्या भात फुटव्याच्या अवस्थेत आहे. पाणथळ किंवा दलदलयुक्त जमीन आणि नत्र खतांच्या अतिरिक्त वापरामुळे निळे भुंगेरेचा प्रादुर्भाव वाढत आहे. ही कीड बांधावरील गवतावर उपजीविका करीत असल्याने बांध स्वच्छ ठेवणे गरजेचे आहे. तसेच भातपिकाची दाट लागवड करू नये अशा सूचना शेतकऱ्यांना करण्यात आल्या. भुंगे गर्द निळ्या रंगाचे असून अळी भुरकट पांढऱ्या रंगाची असते. भुंगेरे पानाच्या वरच्या पृष्ठभागावरील हरितद्रव्य खातात तर अळ्या पान पोखरून करून आतील हरितद्रव्य खातात. पानांवर समांतर पांढरे रेषा उमटलेल्या दिसतात. हळूहळू या रेषा एकमेकांत मिसळतात व त्या ठिकाणी पांढरा पट्टा तयार होतो. नंतर हे पट्टे तपकिरी पडून पाने करपल्यासारखी दिसतात. रोपे सुकतात व वाढ थांबून लोंब्या बाहेर येत नाहीत. अशा काळामध्ये पिकावर रासायनिक नियंत्रणासाठी क्विनॉलफॉस (२५ टक्के प्रवाही) २० मिली किंवा ट्रायझोफॉस (४० टक्के प्रवाही)१२.५ मिली किंवा लॅमडा सायहॅलोथ्रीन (५ टक्के प्रवाही) ५ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी, असे तालुका कृषी कार्यालयामार्फत सांगण्यात आले.

बोरघाटात दोन वाहनांच्या धडकेत एक जण ठार

खालापूर : प्रतिनिधी

पुणे-मुंबई द्रुतगती महामार्गावरील बोरघाटातील ढेकू गावाच्या हद्दीत भरधाव टेम्पोची ट्रकला मागून जोरदार धडक बसून एकाचा मृत्यू झाला. ही घटना शनिवारी (दि.३१) मध्यरात्री २.३० वा. सुमारास घडली.

मुंबई वाहिनीवर टाटा टेम्पो (केए २५ एबी ४२१२) वरील चालक संतोष शेट्टी (वय २७, रा. धारवाड कर्नाटक) हा टेम्पो पुणेहून मुंबईकडे जात असताना बोरघाटातील ढेकू गावाच्या हद्दीत आला असता टेम्पोवरील नियंत्रण सुटल्याने समोर दुसरे लेनवर चालणाऱ्या ट्रक (एमएच १० डीटी ५१९९) यास पाठीमागून जोरात ठोकर दिली. यामुळे क्लिनर बाजूकडील टेम्पोची केबीन आत चेपून क्लिनर गुरूसिद्दा (वय २५) यास गंभीर दुखापती होऊन जागीच ठार झाला.

या घटनेने अर्धा तास वाहतूक ठप्प झाली होती. अपघातग्रस्त वाहने आयआरबीकडील हायड्रा व देवदूत टिमचे सहाय्याने बाजूला काढून वाहतूक सुरळीत करण्यात आली.

माणगावात शक्ती-तुरा नाच व भेदिक लोककलेचा कलाविष्कार

माणगाव : प्रतिनिधी

हरदास वळी (तुरेवाले) तरुण मंडळ यांच्या माध्यमातून लोककलाकारांच्या कला, घराण्याचा आढावा घेणारी तसेच त्यांचे महत्त्व अधोरेखित करणाऱ्या वंशावळ स्मरणिकेचे प्रकाशन शनिवारी (दि.३१) मंडळाचे अध्यक्ष सुरेश महाबळे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित कार्यक्रमात करण्यात आले. या कार्यक्रमात शक्ती-तुरा नाच व भेदिक लोककलेच्या कलाविष्काराचा मनमुराद आनंद लुटला.

या कार्यक्रमास माणगाव कुणबी समाज विकास मंडळ अध्यक्ष महादेवराव बक्कम, रायगड-रत्नागिरी कलगीतुरा सांस्कृतिक शाहिरी मंडळाचे अध्यक्ष रामभाऊ टेंबे, सचिव सचिन माळी, सहादेव बक्कम, शाहीर सखाराम गुगळे, मंडळाचे सचिव नथुराम पाष्टे, शाहिरी मंडळ संचालक शंकर फणसे, महाड मंडळ सचिव अंकुश जाधव, कार्यकारी अध्यक्ष शंकर तुरडे, शाहीर वसंत भोईर, वस्ताद रमेश शिर्के, गुरुवारयो परशुराम खानविलकर, शाहीर दगडू तोंडलेकर, शाहीर दत्ताराम बुवा टेंबे, महादेव माळी, शाहीर केशव घुळघुले, वस्ताद वामनराव म्हसके, वस्ताद बाळकृष्ण भोस्तेकर, गुरुवर्य गंगाराम तळवटकर, शाहीर सखाराम शिंदे, वस्ताद वारिक बुवा, मंडळाचे सहसचिव सदानंद अधिकारी, भास्कर म्हसके, राजाराम जाधव यांच्यासह श्रीकाळभैरव नाच मंडळ न्हावे, श्रीसोमजाई माता नृत्य कलापथक नेराव, आदींसह सभासद उपस्थित होते.

माथेरान येथे आरोग्य तपासणी शिबिराला प्रतिसाद

माथेरान : प्रतिनिधी

माथेरानमधील बैरामजी जिजीभाई रुग्णालयात येथील ज्येष्ठ नागरिकांकरिता शुक्रवारी (दि.३०) आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या शिबिरामध्ये माथेरान येथील ज्येष्ठ नागरिकांची रक्त तपासणी, ईसीजी व रक्तगट तपासणी करण्यात आली. येथील अनेक नागरिकांना रक्ततपासणीसाठी माथेरान बाहेर जावे लागते. ही बाब खूप खर्चिक असते. त्यामुळे नगर परिषद मुख्याधिकारी राहुल इंगळे व येथील बैरामजी जिजीभाई रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी डॉ. रुपाली मिसाळ, डॉ. ऋषिकेश केंद्रे आणि त्यांचे सर्व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

माणगावमध्ये आरटीओ कार्यालय व्हावे

भाजप युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष निलेश थोरे यांची मागणी

माणगाव : प्रतिनिधी

माणगाव हे दक्षिण रायगडमधील मोठी बाजारपेठ आहे. अशा वेळी येथील टेम्पो, रिक्षा, डंपरचालक, मालकांना आपल्या वाहनाची पासिंग व इतर कागदपत्र पूर्ततेकरीता पनवेलजवळील आरटीओ कार्यालयात जावे लागते. त्यामुळे माणगावमध्येच आरटीओचे पूर्ण वेळ कार्यालय सुरू करावे, अशी मागणी भाजचे युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष निलेश थोरे यांनी खासदार धैर्यशिल पाटील यांना निवेदन देऊन केली आहे.

वाहनाच्या पासिंग वेळी अगदी इंडिकेटर तुटलेले असले तरीही पनवेलजवळून पुन्हा रामवाडीला येऊन पुन्हा आरटीओ कार्यालयाकडे जावे लागते. हे टेम्पो, रिक्षा किंवा प्रवासी वाहने हे स्थानिकांनी कर्ज काढून घेतलेली असतात. अशा वेळी नुकसानाला बळी पडल्यानंतर संसाराची आर्थिक घडी बिघडते. अशा विविध अडचणींकरीता टेम्पोचालकांनी भाजप युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष निलेश थोरे यांची भेट घेऊन उपाययोजनेची विनंती केली. यानंतर निलेश थोरे यांनी खासदार धैर्यशील पाटील यांना संपर्क केला. खासदार धैर्यशील पाटील यांनी उपपरिवहन आयुक्त महेश देवकाते यांना संपर्क करून तत्काळ बैठक आयोजित करण्याच्या सूचना दिल्या, तसेच माणगावमध्ये आरटीओ कॅम्प सुरू करावा, वसुलीमध्ये दिलासा देण्याचे आदेश दिले आहेत.

या वेळी भाजप तालुकाध्यक्ष गोविंद कासार, युवामोर्चा उपजिल्हाध्यक्ष परेश सांगले, पेण विधानसभा युवा मोर्चा प्रमुख गणेश पाटील, मोहन बोडेरे, सुरेश खाडे, अनिकेत कांबळे, कृष्णा बोडेरे, सागर जगदाळे व वाहचालक, मालक उपस्थित होते.

यांत्रिकीकरणाच्या युगातही शेतीसाठी बैलगाडीचा वापर

पाली : प्रतिनिधी

बैलपोळा हा श्रावण अमावस्या किंवा भाद्रपद अमावास्या या तिथीला प्रदेशानुसार साजरा करण्यात येणारा बैलांचा सण आहे. बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा हा एक मराठी सण असून हा विशेषतः विदर्भात भव्य पातळीवर साजरा केला जातो. जिल्ह्यातदेखील काही शेतकरी या सणाला विशेष महत्त्व देतात. बैलांना गोडधोड खाऊ देतात व सजवतातदेखील. शर्यतीच्या बैलांचादेखील येथे वेगळा थाट आहे.

यांत्रिकीकरणाच्या युगातही पाली सुधागडसह रायगड जिल्ह्यात अनेक शेतकरी अजूनही शेतीच्या मशागतीसाठी बैलांचा नांगराला पसंती देत आहेत. जिल्ह्यातील भातशेती ही तुकड्यांमध्ये विभागली आहे, तसेच डोंगर उताराला लागून असलेली व दुर्गम आणि दुरच्या पल्ल्यातील शेती, शेताभोवती असलेले बांध यामुळे तेथे ट्रॅक्टर नेणे व नांगरणी करणे गैरसोयीचे होते, मात्र नांगर व बैल कुठेही सहज नेले जाऊ शकतात.

बैल नांगराचा फाळ जमीनीत खोलवर जाऊन जमीन अधिक भुसभूशीत करतो. त्यामुळे पेरणी करणे सोपे जाते. शेतात बैलाचे पाय पडणे हे अनेकांना शुभ वाटते, तसेच बैलांच्या पायामुळे तण व गवत मरतात. यामुळे काही शेतकरी पेरणी व लावणीच्या नांगरणीला नांगराला पसंती देतात.

शर्यतीच्या बैलांचा थाट

जिल्ह्यात पनवेल, उरण, अलिबाग, कर्जत या ठिकाणी बैलगाडा शर्यती जोमात होतात, तसेच बैलगाडा शर्यतीचे शर्यतप्रेमी जिल्ह्यात सर्वत्रच आहेत. पनवेल, उरण, कर्जत या ठिकाणी बिनजोड शर्यती खुल्या मैदानात होतात, तर अलिबागमध्ये समुद्राच्या वाळूवर शर्यती होतात. शर्यत बघण्यासाठी हजारो लोक जमतात. विशेष म्हणजे महाराष्ट्रात कुठेही बैल पळवला तरी रायगड जिल्ह्यात व नवी मुंबईत बैल पाळल्यानंतरच त्याची प्रतिष्ठा ठरते. त्यामुळे येथील शर्यतींना संपूर्ण महाराष्ट्रात महत्त्व आहे. या बैलांचा खुराक व थाट काही औरच असतो. त्यांची अगदी घरातील माणसाप्रमाणे बडदास्त राखली जाते, असे रुपेश मुंगाजी यांनी सांगितले.

माल वाहतुकीसाठीही मदत

जिल्ह्यातील काही गावांत अजूनही धान्य, पेंढा किंवा शेतीला लागणारे समान ने-आण करण्यासाठी बैलगाडी वापरली जाते. विज्ञान व तंत्रज्ञानाने शेतकऱ्यांना सुखाचे दिवस दाखवले आहेत. दळणवळणाच्या साधनांमध्येदेखील अमुलाग्र बदल झाला आहे, मात्र अजूनही काही गाव खेड्यातील लोक शेतीसाठी, धान्य किंवा समान ने-आण करण्यासाठी तसेच विविध कामांसाठी बैलगाडीचा वापर करताना दिसत आहेत.

चावणे येथे शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम

मोहोपाडा : वार्ताहर

कृषी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली रसायनी पाताळगंगा अतिरिक्त एमआयडीसी क्षेत्रातील चावणे येथे यूएनडीपी अंतर्गत भातपिक किडरोग व खत व्यवस्थापन शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आला.

कार्यक्रमास मार्गदर्शक डॉ.जिवन आरेकर शास्त्रज्ञ कृषि विज्ञान केंद्र रोहा यांनी भातपिकावरील खते, किडरोग व्यवस्थापन याबद्दल सविस्तर माहिती दिली व शेतकऱ्यांच्या शंकांचे निरसन केले, तर तालुका कृषि अधिकारी शरद गिते यांनी पीएम किसान योजनेच्या आदिवासीवाडीतील नवीन सेल्फ रजिस्ट्रेशन करण्याबाबत मार्गदर्शन केले. याचबरोबर कृषि विभागातील विविध योजनांबाबत माहिती दिली. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालयाच्या भक्ती म्हात्रे यांनी यूएनडीपी प्रकल्पाबाबत माहिती दिली. मंडळ कृषी अधिकारी भगवान हेगडे यांनी शेततलाव, फळबाग लागवड याबाबत मार्गदर्शन केले.

या वेळी के.टी.बिचूकले, दिनेश ढालपे, ग्रामसेवक विजय नलावडे, केशर पाटील, गिता ठाकूर, गणेश सरदार, लक्ष्मण पाटील यांच्यासह शेतकरी महिला उपस्थित होत्या.

उरण : आमदार महेश बालदी यांच्या विशेष प्रयत्नाने नगर परिषदेमार्फत पूर्ण झालेल्या विकासकामांचे लोकार्पण आणि नवीन विकासकामांचे भूमिपूजन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते रविवारी करण्यात आले. हा सोहळा महाराष्ट्रभूषण तीर्थरूप डॉ. नारायण (नानासाहेब) विष्णू धर्माधिकारी नगर परिषद मराठी शाळा, पेन्शनर्स पार्क या ठिकाणी झाला.

उरण : अखिल आगरी समाज परिषदेतर्फे आगरी समाज काल आज आणि उद्या या शीर्षकाखाली समाजातील लोकप्रतिनिधी, विविध संस्थांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, हितचिंतक आणि समाज बांधव, भगिनींचा भव्य मेळावा रविवारी जासई येथील लोकनेते दि.बा. पाटील सभागृहात झाला.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com